दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -३१२ बुधवार,दि.१६ जुलै २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-312 Wednesday, Dt.16 July 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# भूमाफियांचे काळे कारनामे आ.संदीप क्षीरसागरांनी सभागृहात उघड केले

## बीड शहरातील आरक्षित भूखंडावर प्लॉटींग करून अब्जावधींचा घोटाळा



मुंबई ।प्रतिनिधी

नगरपालिका प्रशासन, नगर रचना विभाग आणि रजिस्ट्री कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हाताशी धरून भ्रष्टाचार करत बीड मधील भूमाफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शहरातील प्लेग्राउंड असो की मंदिर अथवा गार्डन किंवा महिला स्वच्छतागृह या सगळ्यांसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर प्लॉटिंग करून या भूमाफियांनी कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडवत अब्जावधींचा घोटाळा केला आहे. यामध्ये सर्वसामान्य नागरिक आणि शासनाची मोठी फसवणूक झाली आहे. बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी या भूमाफियांचे कारनामे पुराव्या सकट सभागृहात मांडले असून पुढील दोन महिन्यात याबाबत कारवाई करून संबंधित भूमाफिया यांच्यासोबतच अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे आश्वासन नगर विकास राज्यमंत्री यांनी दिले आहे.

बीड शहराचे नागरिकीकरण वाढल्यानंतर जालना रोड असो की नगर रोड अथवा बार्शी रोड या भागामध्ये मोठ्या प्रमाणात प्लॉटिंग निर्माण झाले आणि बंगले अपार्टमेंट रो हाऊस तयार करणारी एक भूमाफी यांची टोळी बीडमध्ये सक्रिय झाली. बीड शहरात प्लॉटिंग करताना काही मंडळींनी नगरपालिका प्रशासन नगर रचना विभाग आणि दस्त नोंदणी कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हाताशी धरून ओपन स्पेस विक्री करत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची चर्चा होती बीड

(उर्वरीत पान २ वर)

# जिद्द, परिश्रमातून बीड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करा : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन




## बीड जिल्हा प्रशासनातर्फे प्रेरणादायी व्याख्यानमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड ।प्रतिनिधी

स्पर्धा परीक्षेचा प्रवास व्यक्तिमत्त्व विकासाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. तरूणांच्या ध्येयपूर्तीसाठी स्पर्धा परीक्षेसाठीचे मार्गदर्शन निश्चित जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येईल. तरी देखील प्रत्येकाने स्पर्धा परीक्षेत, यासह जीवनात यश संपादन करण्यासाठी स्वत:चे स्पष्ट ध्येय ठेवावे. जिद्द व परिश्रमातून आपल्या कुटुंबीयांसह जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तरूणांना केले.

(उर्वरीत पान २ वर)

# ताडसोन्ना शिवारात अवैध वाळू तस्करांच्या पोलिसांनी आवळल्या मुस्क्या

## तब्बल ३८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त पण ४ आरोपी एका ट्रॅक्टरसह फरार

बीड ।प्रतिनिधी

ताडसोना शिवारातील नदीपात्रात काही व्यक्ती जेसीबीच्या सहाय्याने वाळू उपसा करून ट्रॅक्टरद्वारे बेकायदेशीररीत्या चोरटी वाहतूक करत आहेत. अशी गोपनीय माहिती मिळाल्यावरून दि. १५ जुलै २०२५ रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांच्यासह ग्रेड झडख ए.बी. शेळके, पो.शी. ८८७ सानप, पो.शी. २०२१



ढाकणे, पो.शी. १९०४ पिंपळे, पो.शी. १६३७ धोंडे यांनी पंचांसह दुपारी १४.३० वा. घटनास्थळी छापा टाकून धाडसी कारवाई केले यामुळे अवैध वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

कारवाई दरम्यान जेसीबी मालक दत्ता नवनाथ घरबुडे, रा. वडवणी हा घटनास्थळी मिळून आला. सदर ठिकाणी एक जेसीबी, एक ट्रॅक्टर, दोन ट्रॉली असा एकूण रुपये ३८,००,०००/- (अक्षरी रुपये अडतीस लक्ष फक्त) किंमतीचा मुद्देमाल मिळून आला आहे.कारवाई दरम्यान ट्रॅक्टर चालकांनी पोलीस व पंच यांना पाहून ट्रॅक्टर ट्रॉलीतील वाळू जागीच खाली फेकून चार आरोपी

# केज महावितरण कंपनीचा अजब कारभार,प्रिपेड मिटर बसविण्यास मनाई करणाऱ्या ग्राहकांना ३५३ नुसार गुन्हा दाखल करण्याची धमकी


केज/प्रतिनिधी

केज शहरात सध्या महावितरण कंपनीचा अजब कारभार चालु असुन प्रिपेड इलेक्ट्रीक मिटर बसविण्यासमनाई करणाऱ्या ग्राहकांना ३५३ चा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली जात आहे.समाजातील ग्राहकांशी कुठलीही चर्चा न करता हुकूमशाही पद्धतीने मालकांचे जुने इलेक्ट्रिक मीटर बदलून त्या ठिकाणी प्रीपेड ईलेक्ट्रीक मिटर लावून जनतेची हजारो कोटींची लूट करण्याचे महावितरण चे धोरण आहे.जनतेची लूट करणारे महावितरण कंपनी अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांमार्फत नागरिकांना न विचारता प्रीपेड इलेक्ट्रॉनिक मिटर गोरगरीब जनते च्या घरी बसवण्याचा आदेश दिले असताना नागरिकाला न विचारता हे मीटर बसवण्यात येत आहेत.केज शहरातील अनेक भागात बळ जबरीने इलेक्ट्रॉनिक मीटर बसवण्यात आले आहेत.प्रीपेड इलेक्ट्रॉनिक मिटर बसवलेल्यांना त्याची रीडिंग पाहून नागरिकाच्या खिशात काहीच वाचणार नाही प्रीपेड इलेक्ट्रॉनिक हे मायक्रो सेकंद सारखा पडत आहे म्हणून सामान्य नागरिकांच्या खिशात काहीच उरणार नाही,अशीही चर्चा सामान्य नागरीकांतुन होताना दिसत आहे.

प्रीपेड इलेक्ट्रिक मीटर म्हणजे सामान्य जनतेची लूट...

सामान्य नागरिकांना ना त्रास देण्यासाठी महा वितरण प्रीपेडइलेक्ट्रिक मीटर बसवण्याची सुरुवात केली आहे तसेच विद्युत महा वितरण कंपनीने इलेक्ट्रॉनिक मीटर बसवण्यासाठी सुपारी घेतली की काय अशीही शंका येत आहे तसेच हुकूमशाही पद्धतीने नागरिकाला न विचारता हे मिटर नागरिकांच्या घरी बसवत आहे प्रीपेड इलेक्ट्रिक मीटर म्हणजे सामान्य जनतेची लूट प्रीपेड इलेक्ट्रिक मीटर बसवु नयेत नसता सामान्य नागरिकांसोबत घेऊन आंदोलन करावे लागणार असल्याचे ग्राहकातुन बोलले जात आहे.सामान्य माणसाच्या आयुष्यात अनेक अडचणी असताना प्रीपेड इलेक्ट्रिक मीटर बसण्याची परवानगी हुकूमशाही म्हणून तर नाही ना? अशीच चर्चा नागरिकांतून ऐकु येत आहे तसेच महा वितरण गोरगरिबांवर हुकूमशाही पद्धतीने जोर जबरदस्ती करून हे मीटर बसवत आहे तसेच महावितणच्या विरोधात यामुळे नाराजीचा सूर उमटत आहे.केज तालुक्यातील नागरिक आक्रमक होताना दिसत आहे. इलेक्ट्रॉनिक मीटर बसवलेल्या नागरिका मध्ये नाराजीचा सुर निघत आहे.दरम्यान रोग म्हशीला आणि इंजेक्शन पखालीला या म्हणीप्रमाणे विजगळती

रोखण्यासाठी कर्मचारी यांनी आकडे टाकून विज वापर करणाऱ्या वर कडक कारवाई



करावी.चिरीमिरी घेऊन डोळेझाक करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी ग्राहक व्यक्त करीत आहेत.

# राशन माफियाच्या घरातूनच पुरवठा विभागाचा पंचनामा

## होळ येथील धक्कादायक प्रकार ; पुरवठा विभाग 'मॅनेज' असल्याचा ग्रामस्थांचा आरोप



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळ येथील उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या राशन दुकानातून काळ्या बाजारात जात असलेले ४४ क्विंटल स्वस्त धान्य धारूर पोलिसांनी पकडले. त्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या आदेशा नंतर खडबडून जागे झालेल्या केजच्या पुरवठा विभागाच्या तपासणी पथकाने चक्क राशनमाफियाच्या घरात बसूनच पंचनामा केल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे.या प्रकारामुळे कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे.

होळ येथील स्वस्त धान्याचा काळाबाजार धारूरमध्ये उघडकीस आला.उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या कोलंबस सहकारी संस्थे अंतर्गत त्यांचा भाऊ अशोक तुकाराम घुगे हा राशन दुकान चालवतो. त्याने राशनचे धान्य काळ्या बाजारात विक्री साठी

(उर्वरीत पान २ वर)

# सार्वजनिक ठिकाणी व कार्यालयात पिचकारी मारून भिंती रंगवणाऱ्यांनो सावधान

## तालुका तंबाखू नियंत्रण समिती मार्फत कारवाईचा दणका

मानूर (प्रतिनिधी)

शिरूर कासार येथे दिनांक १४ जुलै रोजी शिरूर कासार शहरात सार्वजनिक ठिकाणी गुटखा तंबाखु खाऊन थुंकणारे व धुम्रपान करणारे व्यक्तींवर तालुका तंबाखू नियंत्रण समितीमार्फत कारवाई करण्यात आली. या बाबत माहिती अशी की, तहसीलदार सुरेश घोळवे, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, पोलिस निरीक्षक प्रवीण जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विकास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका तंबाखू नियंत्रण समितीमार्फत सोमवारी शिरूर शहरात छत्रपती संभाजी महाराज चौक, जिजामाता चौक, पेट्रोल पंप, बस स्थानक परिसरात सार्वजनिक ठिकाणी गुटखा तंबाखु खाऊन थुंकणारे व



धुम्रपान करणाऱ्या व्यक्तींवर दडात्मक कारवाई करण्यात आली या कारवाई मुळे तंबाखू व गुटखा खाणारे व धुम्रपान करनाऱ्याची चांगलीच तारांबळ उडून धावपळ झाली सदर कारवाई समिती सदस्य समिर पठाण, सहसचिव विस्तार अधिकारी नितीन तिजोरे, आरोग्य सेवक शाहरुख पठाण व पोलिस हवालदार महादेव सानप यांनी केली .

तरुणांमध्ये व्यसनाधीनता वाढत चालली असून त्याचे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत त्यामुळे व्यसनाधिनता कमी व्हावी या करिता वेगवेगळ्या पद्धतीने जनजागृती करणे व सार्वजनिक ठिकाणी तसेच विविध कार्यालयात गुटखा तंबाखु खाऊन थुंकणारे व धुम्रपान करणारे याच्यावर आवश्यक कारवाई करणे यात सातत्य ठेवने गरजेचे आहे. समिर पठाण सामाजिक कार्यकर्ते तथा सदस्य तालुका तंबाखू नियंत्रण समिती शिरूर .



# अखेर दुरुस्तीकामी शहरातील उड्डाणपूल बंद

परळी (प्रतिनिधी)

शहरातील ईटके कॉर्नर कडून येणारा ओव्हर ब्रीज वरील मुख्य वाहतूक रस्ता २१ दिवस वाहतुकीसाठी पूर्णतः बंद राहणार असून या मार्गावरील वाहतूक प्रशासनाने बायपास मार्गे वळवली आहे. दुरुस्ती कामानिमित्त यापूर्वी दोन वेळा राष्ट्रीय महामार्ग विभागाने प्रशासनाला कळवले होते मात्र विविध कारणाने हे काम करणे शक्य झाले नसल्याने तिसऱ्या वेळी हा उड्डाण पूल दुरुस्ती कामी बंद ठेवण्याचे पत्र विभागाने काढून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ ब यावरील शहरातील डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी उड्डाण पुलाची तांत्रिक दुरावस्था लक्ष्यात घेत या उड्डाणपूलांचे व रस्त्याचे दुरुस्ती व मजबुतीकरणाचे काम करण्यात येणार आहे. दि १५ जुलै ते दि ५ ऑगस्ट २०२५ या २१ दिवस हे दुरुस्ती काम करण्यात येणार असून नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा,

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# मतदार यादीची सफाई

बिहार विधानसभेची २४३ मतदारसंघांसाठी येत्या ऑक्टोबरमध्ये किंवा नोव्हेंबरमध्ये निवडणूक होईल. पण त्यापूर्वीच जोरदार वाद सुरू झाला आहे आणि तो आहे मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षणाचा. बिहार मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण करण्यास निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांकडून सुरुवात होणार आहे आणि तत्पूर्वीच काँग्रेस, राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव आणि काही विरोधी पक्षांनी घेरण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या मते, बिहार मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण करण्यास एवढी थोडी मुदत देण्यामागे आणि विविध निकष पुढे आणण्यामागे तसेच बहुसंख्य मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्याचा भाजपचा डाव आहे. यात राजकारण तर आहेच. पण राहुल गांधी असोत किंवा तेजस्वी यादव असोत, यांना केवळ आपले राजकीय हेतू साध्य करायचे आहेत.

यापूर्वी बिहार मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षणातून काही धक्कादायक तथ्ये समोर आली. त्यांना सामोरे जाण्याऐवजी विरोधी पक्ष केवळ नसते मुद्दे उपस्थित करत आहेत आणि निवडणूक आयोगाचा वेळ वाया घालवत आहे, असा आरोप भाजपने केला, तर संतापण्याचे कारण नाही. बातमी अशी आहे की, बिहारमधील मतदारांमध्ये नेपाळ, म्यानमार आणि बांगलादेशीयांची नावे मोठ्या प्रमाणात आढळली आहेत. आयोगानेच हा खुलासा केला आहे. त्यामुळे विरोधी पक्षांना याबाबत आदळआपट करण्याचे काहीच कारण नाही.

त्यामुळे योग्य तपासणीनंतर आता या अनवॉन्टेड मतदारांना मतदार यादीतून काढल्यानंतरच अंतिम यादी ३० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केली जाईल, असे आयोगाच्या वेबसाईटवर म्हटले आहे. त्यामुळे विरोधकांचे धाबे दणाणले आहेत, कारण त्यांचा फेक नरेटिव्हचा डाव अंगलट आला तसा हाही डाव त्यांच्या अंगलट येणार आहे हे निश्चित आहे. कारण आयोगावर आता पक्षपाती आरोप लावता येत नाही. कारण आयोगाचा साराच कारभार स्वच्छ आणि पारदर्शक आहे. त्यामुळे विरोधी पक्षांची विशेषतः राहुल गांधी यांची पंचाईत झाली आहे. या आधी २००३ साली अशी प्रक्रिया सुरू झाली होती. त्यानंतर आता २०२६ मध्ये ही प्रक्रिया पुन्हा सुरू झाली आहे. मधल्या काळात बरेच पाणी वाहून गेले.मतदानाचा हक्क हा लोकशाहीचा आत्माच. हा अधिकार केवळ देशाच्या नागरिकांना असतो. मात्र बिहारसारख्या राज्यात बांगला घुसखोरांची नावे आढळून आल्याने आणि त्यात म्यानमार तसेच नेपाळी घुसखोर सापडल्याने खळबळ उडणे साहजिकच होते. निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या मतदार याद्यांच्या तपासणीअंतर्गत ही गंभीर बाब उघड झाल्याने विरोधी पक्षांचे पितळ उघडे पडले आणि त्यांचा थयथयाट सुरू झाला आहे. मोठ्या संख्येने बांगलादेशी आणि नेपाळी तसेच म्यानमारवासीयांनी मतदार याद्यात घुसखोरी केल्याचे उघड झाले आहे पण त्यापेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे त्यांनी आधारकार्ड, रेशनकार्ड देखील वापरल्याचे उघड झाले आहे. राजकीय पक्षानींच त्यांना या आधार कार्डचे वाटप केले असणार! अगदी मुंबईच्या वांद्र्यातल्या बेहरामपाड्यात कित्येक मतदारांना आणून बसवले होते आणि त्यांना सर्व प्रकारची मदत करण्यात आली होती आणि त्यात आपले राजकीय पक्षच आघाडीवर होते. त्यातलाच हा प्रकार आहे.भारत हा लोकशाहीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. पण या लोकशाहीप्रधान देशात लोकशाहीच्या मूलभूत आधारस्तंभांना पोखरले जात आहे याचे विदारक वास्तव या प्रकाराने समोर आले आहे. आधार कार्ड हा कोणत्याही नागरिकाच्या शुचितेचा पुरावा नाही, असे आयोगाने सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट सांगितले आहे. त्याचेच प्रत्यंतर आधार कार्डचे कुणालाही आणि कसेही वाटप केल्याने आले आहे. काँग्रेसच्या काळात आधार कार्डचे वाटप करण्यात आले आणि त्यावेळी त्याचा खूप गाजावाजा करण्यात आला होता. पण, त्यामुळे काहीही साध्य झाले नाही. केवळ बोगस नागरिकांची नोंद आधार कार्डमुळे झाली, असे आरोप तेव्हाही झाले होते.

# आईप्रमाणे मातृसंस्थेवर प्रेम असेल तरच शैक्षणिक संस्था नावारूपास येतील - कुलगुरु डॉ. विजय फुलारी

## शैक्षणिक संस्थेचे कर्मचारी हे माझे अवयव - संस्थाध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे

आष्टी (प्रतिनिधी)

आपआपल्या जबाबदारी पाळल्या की ते कार्य चांगलेच होते. महाविद्यालयातील विद्यार्थी देशपातळीवर पोहचले की ते महाविद्यालय जगाच्या नकाशावर येते. या विद्यार्थीचे कौतुक केले जाते. शिक्षकांनी कामावर लक्ष केंद्रित करावे, तासिका व्हायलाच पाहिजेत. एक विद्यार्थी असला तरी तासिका झालीच पाहिजे अन्यथा मी महाविद्यालयाची मान्यता स्थगीत करीन अशा इशारा देत आईप्रमाणे मातृ संस्थेवर प्रेम असेल तरच शैक्षणिक संस्था नावारूपास येतील असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापाठाचे कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांनी केले.

संस्थाध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की, ५०० बेडचे कन्सर हॉस्पीटल उभारणार आहोत. संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा हे हास्पीटल उभारण्यात मोठा वाटा असणार आहे. मराठवाड्यात नाही असे मोठे कन्सर हास्पीटल करणार आहोत. संस्थेचे कर्मचारी हे माझे अवयव आहेत. मी निवडणुक जिंकल्याने जनतेचाच फायदा होणार होता कारण मी कधी गुत्तेदारी केली नाही. करणारही नाही. माझा नातेवाईक जि. प. अध्यक्ष पण करायचा नाही. नशीबात जे असते तेच होते. मी कुणाला दोष देत नाही. लोकांसाठी मी सामाजिक कार्य करीतच राहणार आहे. मी पुर्वी कर्मचारी भरती करताना कार्यकर्त्यांनी सांगितलेले पात्र शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी घेतले. संस्थेतुन शिक्षण घेऊन बाहेर पडलेले २५ हजार विद्यार्थी विविध क्षेत्रात नौकरीत आहेत. आष्टीत इंजिनियरींग कालेज सुरु केले आहे. आणखी दोन इंजिनियरिंग कालेज सुरु करणार आहोत. लोकांच्या हिताचे आणि नैतिकता सांभाळुन काम करत राहणार आहे. कर्मचारी हे माझ्या शरिराचे अवयव आहेत. आष्टी शहरातील गंगाईनगर येथील आनंद शैक्षणिक संकुलात शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आनंद चॅरिटेबल संस्था आणि भगिनी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक सहविचार सभा आयोजित करण्यात आली. या सभेत सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सहविचार सभेत उपस्थितांना मार्गदर्शन करताना भीमराव धोंडे हे अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.



यावेळी डॉ. संतोष आडाकुल, भास्कर चाटे, डॉ. अजय धोंडे, अभय धोंडे, राजेंद्र धोंडे, उपसभापती नामदेव धोंडे, किशोरनाना हंबर्डे, सतीषआबा शिंदे, ड. हनुमंत थोरवे, विजयशेठ मेहेर, नियामत बेग, अशोक साळवे, दिनकरराव तांदळे, भाऊसाहेब लटपटे, राम खाडे, प्राचार्य डॉ. सोपान निंबोरे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, ड. रत्नदीप निकाळजे, इंजि. बाळासाहेब भुकन, उत्तम बोडखे, छगन तरटे, आण्णासाहेब लांबडे, अस्ताक शेख, सदाशिव दिंडे, सरपंच अशोक मुळे, संपत शेळके, संतोष कदम, संजय चंदनशिव, कुंडलीक आस्वर, उध्दव विधाते, गौतम ससाणे, गौतम सावंत, अनिल जायभाये, वाय. आर. गर्जे, रघुनाथ शिंदे, संभाजी जगताप, आदेश निमोणकर, संदीप पगारे संस्थेचे सर्व प्रशासन अधिकारी, शिक्षक वर्ग आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचीही उपस्थिती होती. ही सहविचार सभा संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा व दृष्टिकोनाचा एक उत्कृष्ट प्रतीक ठरली. यावेळी संस्थेचे सहसचिव युवा नेते डॉ. अजय धोंडे यांनीही आपले प्रेरणादायी मनोगत व्यक्त करत उपस्थित शिक्षक वर्गास प्रेरणा दिली.

कुलगुरु डॉ. फुलारी म्हणाले की, खाओ पिओ आराम करो अशी आवस्था शिक्षक, प्राध्यापकांची असु नये. आई प्रमाणे मातृ संस्थेवर प्रेम असेल तर ती शैक्षणिक संस्था नावारुपाला येतेच येते असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थीना शिक्षकांनी शिस्त लावावी. स्नेह मेळाव्यानिमित्त नामवंत कंपन्या बोलवा. त्यामुळे विद्यार्थीना फायदा होतो. उद्योजक निर्माण व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. १०० पैलवान; पण कधी दादागिरी केली नाही ५ आगस्ट २०२५ रोजी आष्टीत कन्सर हास्पीटलचे भुमीपुजन करणार आहोत. आपण कधी दादागिरी केली नाही. व्यायामशाळेत १०० पैलवान आहेत. राजकारणात कुणाच्या अंगावर घातले नाही. ते पैलवान फक्त शरीर कमविण्यासाठी पैलवान करत आहोत. आपण आपले गाव बरे असे मानुन आपण मतदर संघातच सामाजिक व शैक्षणिक कार्य करणार आहोत. देवापेक्षा श्रेष्ठ मानलेले आहे. प्राध्यापक, शिक्षक यांनी भावकी करु नये. सर्वांना सहकार्य मदत करीत राहा लोक तुम्हांला चांगलेच म्हणतील. यावेळी डॉ. संतोष आडाकुल म्हणाले की, माणसांच्या अपेक्षांची यादी वाढली की जीवनात दुःख होते. एकाच कारणाने सर्वजणांचा आनंद गेलेला आहे ते म्हणजे तणावाने, मनासारखे घडले नाही तर वाट्याला दुःख येते. मनाविरुध्द घटना घडली तरी डोके शांत राहायचे आणि नंतर योग्य अक्शन घ्यायची, मनाचा कन्सर सत्य स्विकारले नाही तर वाढतो. जीवन जगताना समतोलाने जगले पाहिजे. आयुष्याला बलेन्सिंग ठेवावे असे आवाहन डॉ. संतोष आडाकुल यांनी केले.

यावेळी प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, इंजि. डॉ. संतोष आडाकुल यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मण मिसाळ व प्राचार्य डॉ. बाळासाहेब खेमगर यांनी केले तसेच मान्यवरांचे परिचय वाचन प्रा. पोपट काळे यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. श्रीराम आरसुळ यांनी मानले.

# पाटोदा येथील जामीया बहरूल ऊलुम मदरशातील २८ विद्यार्थ्यांनी गणित इंग्रजी विषयात मिळवले ३० पैकी ३० गुण

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा येथील जामीया बहरूल ऊलुम मदरशामधील विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासातील सातत्य आणि मेहनतीमुळे मासिक घेतल्या गेलेल्या गणित व इंग्रजी चाचणीत चांगले यश मिळवले आहे.या चाचणी मध्ये ३० पैकी ३० गुण मिळवून २८ विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.प्रत्येक महिन्याला मदरशामध्ये ३० गुणांची चाचणी घेतली जाते.ही चाचणी गणित व इंग्रजी आणि मराठी या विषयांमध्ये घेण्यात येते.सदर चाचणी सलीम तांबोळी सर मुफ्ती जफर साहब यांच्या मार्गदर्शनाखाली होते.शिकवण्याच्या पद्धतीत सातत्य, सराव व वैयक्तिक लक्ष यावर भर देण्यात येतो.विद्यार्थ्यांनी मेहनत, चिकाटी आणि अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवले.शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य हाही या यशामागील मुख्य घटक ठरला.मुलांनी नियमित मराठी गणित इंग्रजी विषयाचा अभ्यास चांगला व अभ्यासातील ताळमेळ साधला आहे.गणित व इंग्रजी हे दोन्ही विषय अनेकांना कठीण वाटतात.परंतु या विद्यार्थ्यांनी हे सिद्ध केले



की मेहनतीने काहीही अशक्य नाही.मदरशातील इतर विद्यार्थ्यांसाठीही हे एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. तसेच या विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल गणित इंग्रजी विषयाचे शिक्षक प्रा. सचिन गायकवाड सर यांच्या तर्फे सर्व विद्यार्थ्यांना पॅड बक्षीस म्हणून देण्यात आले या वेळी मौलाना मोईज साहब मौलाना मझर साहब मौलाना जुहर साहब मौलाना आरबाज साहब मराठी विषयाचे शिक्षक अमजद खान पठाण इंग्रजी गणित विषयाचे शिक्षक सचिन गायकवाड सर पठाण चांद खान हुसैन खान तसेच आयुब भाई अमजद खान पठाण यांनी सर्व मुलांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत मदरशामध्ये अशा चाचण्या नियमित होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निर्माण होते. गणित व इंग्रजीचे कौशल्य भविष्यात उपयोगी पडते.विद्यार्थ्यांनी हे यश मिळवण्यासाठी वेळेचे व्यवस्थापन उत्तम केले.या चाचणीचा निकाल हे त्यांचे अथक परिश्रम दर्शवतो.सलीम सरांच्या मार्गदर्शनाबद्दल विद्यार्थ्यांनी आभार मानले. सर्वांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले




# केज शहरात गुरुकृपा योगा अकॅडमीचा शुभारंभ

केज/प्रतिनिधी

केज शहरामध्ये कानडी रोड येथे गुरुकृपा योगा अकॅडमीचा शुभारंभ दि.१५ जुलै २०२५ मंगळवार रोजी ठाकुर रामकृष्ण परमहंस परिवाराच्या गुरुमाई खंदारे आईंच्या हस्ते करण्यात आला.या शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. उत्रेश्वर जाधव सर हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून दिपाताई काटे, सपनाताई शर्मा,उमा ताई वळसे या उपस्थित होत्या.गुरुकृपा योगा अकॅडमीच्या संचालिका सुवर्णाताई शेटे यांनी प.पू. वासुदेवराव खंदारे गुरुजीं पासून प्रेरणा घेऊन योगाभ्यासाचे अध्ययन केले. संचालिका सुवर्णाताई शेटे यांनी प्रास्ताविकात सांगितले की,सध्याच्या धावपळीच्या जीवन शैलीत महिला पुरुष व बालकांचे आरोग्य, मनस्वास्थ अस्थिर झालेले आहे.प्रत्येकाला स्वतःचे जीवन सुस्थिर करण्यासाठी योग साधना खुप महत्वाची आहे.योग साधने द्वारे प्रत्येकाने स्वतः सह कुटुंबाच्या आयुष्यात आमुलाग्र बदल होतात. असे प्रतिपादन केले. याप्रसंगी प्रमुखपाहुण्या दिपाताई काटे यांनी मनोगत व्यक्त केले.तर अध्यक्षीय समारोप उत्रेश्वर जाधव सरांनी केला.यावेळी महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

### राशन माफियाच्या...

पाठवल्याची कबुली वाहन चालकाने दिली.तसा धारूर पोलिसांनी पुरवठा विभागाला अहवाल दिला आहे.या पार्श्वभूमी वर राशन दुकानाची केजच्या तालुका पुरवठा विभागाकडून तपासणी करण्यात आली.या पथकात तालुकापुरवठा निरीक्षण अधिकारी सुजाता मेश्राम,श्रीमती उंबरे, मंडळ अधिकारी संतोष देशमुख,तलाठी नामदेव उगले यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. मात्र पंचनामा करण्या साठी संबंधित दुकानात न जाता,त्यांनी थेट राशन माफियाच्या घरातच बसून पंचनामा सुरू केला.ही बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी केज तहसीलदारांना कळवले तहसीलदारांनी त्वरित हस्तक्षेप करत पथका तील अधिकाऱ्यांना खडसावले.त्यानंतर दुकानात बसूनपंचनामा पूर्ण करण्यात आला. या संपूर्ण प्रकारामुळे होळ येथील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गोंधळ पुन्हा एकदा उघड झाला असून, जिल्हाधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करावी,अशी मागणी होत आहे.

### भूमाफियांचे काळे ..

शहरात भूमाफी यांनी जो काही नंगानाच केला आहे त्यामध्ये लहान मुलांच्या खेळण्यासाठी चे आरक्षित असलेले ग्राउंड असो किंवा गार्डन मंदिर सुलभ शौचालय यासाठी लेआउट मंजूर करताना जी जागा आरक्षित ठेवली आहे तीच जागा सर्वसामान्य प्लॉट धारकांना विक्री करून भूमाफियांनी कोट्यावधी रुपये छापले असल्याचे चर्चा होती. यासंदर्भात मागील सहा सात महिन्यापासून पाठपुरावा करणारे बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि१५) रोजी सभागृहात लक्षवेधी सूचनेद्वारे शासनाचे आणि संबंधित नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले. आमदार क्षीरसागर हे या विषयावर आक्रमक झाल्याचे सभागृहात दिसून आले.

बीड नगरपरिषद अंतर्गत सर्वे नंबर २९ तरफ माळी सर्वे नंबर १९४ तर बलगुजर सर्वे नंबर १९७ १९८ १९९ तरफ खोड सारडा रेसिडेन्सी व इतर, सर्वे नंबर ३४ ३५ ६८ ६९ ७९ तरफ गिराम, सर्वे नंबर १७३ तरफ बलगुजार, सर्वे नंबर ५३ सर्वे नंबर ५६ ५९ सर्वे नंबर १८८ तरफ पिंगळे, सर्वे नंबर १६ सर्वे नंबर १७ तरफ देशमुख सर्वे नंबर १५१ सर्वे नंबर १५२ तर बोबडे या सर्वे नंबर मध्ये भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात आरक्षित असलेले भूखंड विक्री केले आहेत किंवा चुकीचा लेआउट मंजूर करत भूखंड आरक्षित ठेवलेले नाहीत विशेष बाब म्हणजे प्लेग्राउंड आणि इतर गोष्टींसाठी आरक्षित केलेली जागा या ठिकाणी विक्री करून शासनाची फसवणूक केल्याचा प्रकार आ.क्षीरसागर यांनी सभागृहात उघड केला आहे.

### जिद्द, परिश्रमातून...

स्पर्धा परीक्षा तयारीत विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या संकल्पनेतून बीड जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (ता.१४) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन झाले. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिरात परीविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्रीमती पूजा पवार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेले उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीकृष्णकुमार बाहेती यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, राजेश सुपेकर, महादेव चौरे, दादासाहेब शेळके आदी उपस्थित होते.श्रीमती पवार यांनी स्वानुभवातून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. स्वप्नांचा पाठपुरावा, नैतिक मूल्यांची जाणीव आणि अभ्यासातील शिस्त या विषयांवर मार्गदर्शन केले. यशाचा प्रवास,

पान १ वरून...

अडचणींवर मात करण्याचे तंत्र, अभ्यासाचे नियोजन, वेळ व्यवस्थापन, परीक्षा तयारीतील सकारात्मक आणि नकारात्मक टप्पे याबाबत श्री. बाहेती यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी नैतिक मुल्ये, कौटुंबिक आणि सामाजिक समतोल याबाबतही विचार मांडले.

पान १ वरून...

कार्यक्रमातील संवाद सत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे निरसन जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, पोलिस उपअधीक्षक आणि उपप्रादेशिक अधिकारी यांनी केले. अपर जिल्हाधिकारी धार्मिक यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी काजल ससाणे आणि शरद घोडके यांनी केले. आभार जाधवर यांनी मानले.

# खोटी तक्रार देवुन पोलीस प्रशासनास वेठीस धराल, निरपराध लोकांना विनाकारण त्रास दिला तर कदापी खपवून घेणार नाही - पोलीस अधीक्षक नवनीत काँवत

## खोट्या फिर्यादी देणारे खेडकर माळी,भोसले विरुद्धच गुन्हे दाखल !

बीड ।प्रतिनिधी

तीन वेगवेगळ्या घटनेमध्ये खेडकर, माळी आणि भोसले यांनी निरापराध लोकांना त्रास देण्याच्या हेतूने पोलिसांना खोट्या तक्रारी देऊन गुन्हे दाखल करण्यासाठी वेठीला धरले. तक्रार करणारे फिर्यादीच खोटे असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी या फिर्यादींना चांगलेच फैलावर घेऊन त्यांच्याच विरोधात गुन्हा दाखल करत कारवाई केली. या कारवाईमुळे खोट्या तक्रारी दाखल करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. या कारवाईमुळे मात्र पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे सामान्य जनतेतून अभिनंदन होत आहे.

दिनांक १३ जुलै २०२५ रोजी पोलीस स्टेशन केज येथे इसम नामे अंगद अनंत खेडकर रा. तरनळी ता. केज याने फिर्याद सांगीतली की, साखर कारखान्याची ऊस तोडणीसाठी उचल घेवुन गावाकडे जात असतांना मोटार सायकलवरुन आलेल्या तीघांनी त्यांचा पाठलाग करुन त्याला रस्त्यात आडवून त्याला शस्त्राचा धाक दाखवुन त्याच्याकडील १,७५.०००/- रुपये हिसकावून घेवुन पळून गेले अशी फिर्याद सांगत होता. परंतु पोलीसांकडून सदर प्रकरणात चौकशी केली असता त्यामध्ये सदरचा प्रकार हा बनाव असल्याचे निष्पन्न झाले. पोलीसांना खोटी माहिती देऊन पोलीसांची दिशाभूल केल्यामुळे मुळे सदर इसमाविरुद्ध पोलीस स्टेशन केज येथे गुर.नं. ७४६/२०२५ कलम २१७ भा.न्या.सं. प्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच दुसऱ्या घटनेत इसम नामे विठ्ठल श्रीहरी माळी रा. मोरेवाडी ता. अंबाजोगई याने डायल ११२ ला फोन करुन माहीती दिली की, त्याचे धोंडीराम आण्णा चव्हाण व बरकते रा. गांधीनगर अंबाजोगई यांनी अपहरण करुन त्याला मारहाण करुन त्याच पाय मोडला आहे. तसेच त्याला एका खोलीत डांबून ठेवले आहे. ठिकाण कोठे आहे हे मला सांगता येत नाही. असा फोन केल्याने घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी कॉल करणारे व्यक्ती तांत्रीक माहीतीच्या आधारे लोकेशन घेवुन त्याचे लोकेशन निश्चीत करुन तेथे पोलीस स्टेशन धारुर येथील सपोनि देविदास वाघमोडे, अंबाजोगई ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. मुरलीधर खोकले यांना तात्काळ घटनास्थळी पाठवीले. दोन्ही पोलीस स्टेशनचे पोलीस पथक घटने ठिकाणी जावून पाहीले असता. सदर इसमाने त्याचे अपहरण झाल्याचा खोटा



बनाव केला असल्याचे निष्पन्न झाले. त्याने पोलीसांची दिशाभूल केल्यामुळे त्याचे विरुद्ध पोलीस स्टेशन धारूर येथे गुर.नं. ४५१/२०२५ कलम २१७ भा.न्या.सं. प्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिसऱ्या घटनेत इसम नामे सानप शास्त्री भोसले रा. शेरी ता. आष्टी हा दिनांक ०९/०७/२०२५ रोजी त्याचे फिर्यादीवरुन ॲट्रॉसीटीचा गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी मा. जिल्हाधीकारी कार्यालयासमोर उपोषणास बसला होता, त्याच्या उपोषणाची दखल घेवून पोलीस स्टेशन आष्टीचे पोलीस निरीक्षक श्री. शरद भुतेकर यांनी त्यास फिर्याद देण्यासाठी पोलीस स्टेशन येथे बोलविले. त्यावेळी इसम सानप शास्त्री भोसले यांनी पोलीस स्टेशन येथे कोणतीही तक्रार न देता पोलीस स्टेशन आष्टी येथे त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. सदर प्रकार हा पूर्णतः बनावट असून इसम सानप शास्त्री भोसले व गैरअर्जदार यांचेत पैशांचा वाद होता. सदरचा प्रकार हा पैशांच्या व्यवहारातुन घडलेला असून तो व्यवहार पूर्ण करण्यासाठी त्यांनी पोलीस व प्रशासनास वेठीस धरल्याचे निष्पन्न झाले आहे.अशा खोट्या तक्रारींमुळे निरपराध लोकांना विनाकारण त्रास होतो. तसेच ज्या तक्रारी खऱ्या असतात अशा तक्रारीमध्ये सुद्धा पडताळणी करावी लागते. ज्यामुळे खरे तक्रारदार नागरीक यांचे मनामध्ये पोलीसांबद्दल तिरस्काराची भावना निर्माण होते. त्यामुळे खोटे गुन्हे दाखल करणाऱ्यांवर आता यापुढे गुन्हे दाखल करून कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. खोटी तक्रार देवुन प्रशासनास वेठीस धरणे, पोलीसांची दिशाभूल करणे, तसेच निरपराध लोकांना विनाकारण त्रास देणे असे प्रकार आता कदापी खपवून घेतले जाणार नाही, असे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी सांगीतले आहे.

# राज्याचे उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार व आ धनंजय मुंडे यांचा वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा सप्ताहाच्या प्रारंभी ६३ रक्तदात्यांचे उत्स्फूर्त रक्तदान

## श्री योगेश्वरी देवी महाआरती, किरमानी दर्गा व संघर्ष भूमी येथे वंदन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांचा वाढदिवसॅनिमित्त आयोजित सेवा सप्ताहात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या सप्ताहाचा प्रारंभ ग्रामदैवता माता श्री योगेश्वरी देवीची महाआरती करून करण्यात आली. त्यानंतर चनई येथील किरमानी बाबांच्या दर्ग्यावर फुलांची चादर चढवून अजितदादा पवार व धनंजय मुंडे यांच्या निरोगी व दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्यासह बीड जिल्हाध्यक्ष ऍड राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, ऍड विष्णुपंत सोळंके,सत्यजित सिरसाट राजाभाऊ औताडे, बालासाहेब शेप,बबन लोमटे यांच्यासह शेकडो सहकारी उपस्थित होते.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी तथा बीड जिल्हाध्यक्ष ऍड राजेश्वर चव्हाण यांच्या पुढाकारातुन १५ ते २२ जुलै दरम्यान सात दिवस सात उपक्रम संकल्पनेवर आधारित अंबाजोगाई शहरात सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहा अंतर्गत आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता, शिक्षण तथा जनजागृती अशा विविध विषयावर आधारित विविध कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे.

या सेवा सप्ताहाच्या प्रारंभी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या शासकीय रक्तपेढी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन देखील करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन राजकिशोर मोदी, ऍड राजेश्वर चव्हाण, स्वा रा ती चे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे, वैद्यकीय अधिक्षक डॉ राकेश जाधव, मानसोपचार तज्ञ डॉ राजेश इंगोले व उद्धवबापू आपेगावकर अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.यावेळी ६३ जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. आमदार धनंजय मुंडे यांनी राज्यात विविध खात्यांचा पदभार सांभाळून राज्यात विविध विकासकारि, लोकोपयोगी तथा महत्वकांक्षी प्रकल्प यशस्वीपणे राबवून आपल्या कर्तृत्वाची छाप राज्यभर उमटवली आहे. धनंजय मुंडे यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून त्यांच्या अनेक सहकाऱ्यांची फळी निर्माण केली आहे.




आमदार धनंजय मुंडे यांनी मी माझा वाढदिवस साजरा करणार नाही व माझ्या सहकार्यांनी तो साजरा न करण्याचे आवाहन केले असले तरी राज्यभरात त्यांचे हजारो सहकारी तसेच चाहते असल्याने धनंजय मुंडे यांचा वाढदिवस विविध विधायक तथा सामाजिक उपक्रम राबवून आज राज्यभरात वाढदिवस साजरा करत आहेत.


राज्याचे उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार आणि आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा सप्ताहानिमित्त महारक्तदान शिबिरासाठी स्वा रा ती च्या रक्तपेढी विभाग प्रमुख डॉ अरविंद बगाटे,डॉ विनय नाळपे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ पारखे, डॉ अक्षय कदम,डॉ अकांक्षा उम्रेडकर , डॉ जान्हवी पाटील, सार्थक उदावंत, शेख बाबा, प्रिया गालफाडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या रक्तदान शिबिरात महादेव आदमाने ,अंकुश हेडे, दत्ता सरवदे, महेश कदम यांचे अनेक सहकारी मित्र रक्तदान करण्यासाठी उत्स्फूर्तपने आले होते. दि१५ मंगळवार रोजी सेवा सप्ताहात अजित गरड, गोविंद देशमुख, विलास मोरे, विश्वभर फड, बाळासाहेब देशमुख, मनोज लखेरा, कचरूलाल सारडा, किशोर परदेशी, संकेत मोदी, धम्मा सरवदे, दिनेश भराडीया, सुनील वाघळकर, चंदू महामुनी, सुधाकर टेकाळे, राजाभाऊ शेप, दिलीप चामणर , खंडू गोरे,भीमसेन लोमटे, पंडित हुलगुंडे,खलील जाफरी, दत्ता सरवदे, रणजित लोमटे, जावेद गवळी , महेबूब गवळी, अकबर पठाण, रशीद भाई, सचिन जाधव, सय्यद ताहेर,विशाल पोटभरे, गोविंद पोतंगले,आकाश कऱ्हाड, अस्लम शेख, मणियार, कैलास कांबळे, रोहन कुरे,शरद काळे वजिर शेख,अजिम जरगर, संतोष चिमणे, रोहित हुलगुंड

# माध्य. शिष्यवृत्ती परीक्षेत आराध्या गीते शिरूर का. तालुक्यात प्रथम

मानूर (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत घेण्यात आलेल्या ९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये जि. प.प्रा.शा. दहिफळेवस्ती केंद्र मानूर ता. शिरूर कासार जिल्हा बीड या शाळेची विद्यार्थिनी आराध्या विठ्ठल गीते हिने माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शिरूर कासार तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावत शाळेच्या नावलौकिकात भर टाकली. शिवांजली पिंपळेश्वर मानूरकर हिनेही गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. याबद्दल दोघींचेही कौतुक करण्यात आले. पित्याचं नातं हरवलेली ही चिमुकली आराध्या अत्यंत कौशल्य व नियोजनबद्ध पद्धतीने अभ्यासाशी मैत्री करून आहे. तिने पाचवी शिष्यवृत्ती मध्ये ही गुणवत्ता यादीत स्थान मिळवले होते. सहावी मंथन, सातवी मंथन, आठवी एन.एम.एम.एस. या स्पर्धा परीक्षेतही गुणवत्ता यादीत येण्याचं मानांकन तिच्या नावावर आहे. पाचवी ते आठवी या वर्गातील सर्व स्पर्धा परीक्षेच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवणारी ही गुणी विद्यार्थिनी निश्चितच येणाऱ्या काळात शिरूर कासार तालुक्याचा नावलौकिक वाढवल्याशिवाय राहणार नाही, असे मत शिवचरित्रकार कैलास तुपे सर यांनी व्यक्त करत आराध्या गीते व शिवांजली मानूरकर





यांना शुभेच्छा दिल्या. फक्त स्पर्धा परीक्षाच नाही तर वक्तृत्व, निबंध, रांगोळी, पथनाट्य यासारख्या अनेक स्पर्धेत आराध्या गीते, शिवांजली मानूरकर यांनी प्राविण्य मिळविलेले आहे. दोघीही उत्तम सूत्रसंचालन सुद्धा करतात. २०१८ पासून जि.प.प्रा.शा. दहिफळे वस्ती सातत्याने राज्यस्तरीय केंद्रस्तरीय स्पर्धा परीक्षेमध्ये गुणवत्ताधारक विद्यार्थी घडवण्याचा प्रयत्न करत आहे. यावर्षीही या मुलींनी यात खंड पडू दिला नाही याबाबत मुख्याध्यापक संतोष गर्जे यांनी अभिनंदन केले. मंथन स्पर्धा परीक्षेत इयत्ता चौथी मधून शिवम मानूरकर, वेदिका गोरे, वैष्णवी शिरसाट, तिसरी मधून सानवी केदार सातवी मधून भार्गवी तुपे, शिवम तुपे ,भागवत बडे, सहावी मधून ऋतुजा रमेश केदार या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत गुणवत्ता यादीत स्थान पटकावले याचा शिक्षक म्हणून अभिमान वाटतो. असे मत उपक्रमशील आदर्श शिक्षिका शितल काळदाते मॅडम यांनी व्यक्त करत मुलांना शुभेच्छा दिल्या. दत्तू शिरसाट,अंकुश खेडकर,नवनाथ सुपेकर,रंजित खटके, आगा पठाण यांनी ही सर्व मुलांचे कौतुक केले. मानूर केंद्राचे केंद्रप्रमुख का.भा. खेडकर सर, जमीर शेख साहेब, ग. शि.अ. प्रशांत शिंदे साहेब यांनीही विद्यार्थी व शाळेचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

# कानेश्वर विद्यालय कानडी माळी येथे १९९९ - २००० इयत्ता १० वी बॅचचे स्नेह मिलन संपन्न

केज/प्रतिनिधी

वर्षा मागून वर्ष सरत जातात शिक्षण करियर लग्न नोकरी या साऱ्या धकाधकीच्या जीवनात शाळा कॉलेजमधले वर्ग मित्र मैत्रिणीही अक्षरशः विखुरले जातात. कित्येक वर्ष तर भेटही होत नाही फोन तर दूरच कुठे असेल आता तो. कुठे असेल आता ती. हा प्रश्न सतत मनाला छळत असतो मात्र काळजा मधून आठवणी पुसत नाहीत. आणि मग सोशल मीडियावर शोध सुरू होतो.त्या सर्व बाल दोस्तांचा आणि भरतो कार्यक्रम गेट-टुगेदर चा..

शाळेतल्या त्या मस्त आठवणी सरांचं रागावणं,चिडणं,मारणं, चोरून डबा खाणं आठवतं आणि आठवतात एकमेकांना चिडवायच्या कितीतरी गोष्टी आणि मग उजाडतो तो गेट-टुगेदर चा दिवस आणि सुरू होते मौज मजा आणि आठवणींची हिरवळ कार्यक्रमाची..आनंदाचे क्षण पुन्हा जगूया जुन्या आठवणींना जावूया शाळेच्या अंगणात फुलवलेली तीमौजमजा आज पुन्हा अनुभवूया चला मित्रांच्यागलक्यात हरवून जाऊया.. आजचा हा गेट-टुगेदर चा दिवस प्रत्येकासाठी खासच असतो कारण सगळेजण तर भेटणार असतात पणवर्गातल्या बेंचवर जगलेल्या आठवणी सुद्धा भेटणार असतात.

मांगल्याचा नवचैतन्या चा आणि केलेल्या आठवणी सुद्धा हा नवचैतन्याचा आणि हर्षाचा प्रकाश आनंद घेऊन आला आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष गरडे सर,मुख्याध्यापक कानेश्वर विद्यालय कानडी माळी यांची उपस्थिती होती तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक गवळी सर,गीते सर,खाडे सर,गिरी सर, मुख्याध्यापक,जि.प. उच्च प्राथमिक शाळा, कानडी माळी,श्रीमती शेळके मॅडम व आदर्श शिक्षक नरहरी काकडे सर उपस्थित होते. यावेळी मुलांनी शाळे तील त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच त्यांच्या जीवनातील शिक्षकांचा योगदान



याबद्दल मनोगतही व्यक्त केले. यावेळी सुधीर नाईकनवरे,सुनील राऊत,अनुराधा शिंदे, वंदना शिंदे,महादेव मस्के,विनोद राऊत, जालिंदर राऊत,मनोज काळे,माधव वाघमारे, सोनाजी काकडे यांनी आपल्या मनोगतातून शाळेच्या गुरुजनांच्या प्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक श्री. नरहरी काकडे सर यांची खूप मदत झाली. कार्यक्रमाचेसूत्रसंचालन सुधीर नाईकनवरे यांनी केले व आभार प्रदर्शन श्री.काकडे सर यांनी केले.

# धारूर तालुक्यातील ५६ पैकी ४१ ग्रामपंचायतचे सरपंच पद राहणार आरक्षित २९ ठिकाणी करणार महिला राज

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यात एकूण ५६ ग्रामपंचायत असून यामध्ये सरपंच पदाचे आरक्षण तहसील कार्यालयात काढण्यात आले यामध्ये ४१ ग्रामपंचायत चे सरपंच पद हे आरक्षित राहिले आहे तर २९ ग्रामपंचायतीवर महिला सरपंच राज करणार आहेत हे आरक्षण पुढील पाच वर्षासाठी असून आरक्षणामुळे अनेक इच्छुकांचे मात्र स्वप्न भंगल्याचे दिसून आले आहे.

धारूर तालुक्यात ५६ ग्रामपंचायत असून या ग्रामपंचायतीचे २०२५ ते ३० या कालावधीतील सरपंच पदाची आरक्षण सोडत तहसील कार्यालयाच्या सभागृहात तहसीलदार श्रीकांत निळे यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली यामध्ये अनुसूचित जाती करता नऊ ग्रामपंचायत आरक्षित असून यामध्ये महिला करता पाच ग्रामपंचायत तर महीला करता अरक्षीत नसणाऱ्या चार ग्रामपंचायत आरक्षित आहेत याचप्रमाणे अनुसूचित जमातीसाठी दोन ग्रामपंचायत आरक्षित असून एक



महिला व एक महीला करता आरक्षीत नसणारी आहे इतर मागासवर्गीयासाठी १५ ग्रामपंचायत आरक्षित असून यामध्ये महिलांसाठी आठ ग्रामपंचायत आरक्षित आहेत तर महीला करता आरक्षीत नसणाऱ्या तर सर्वसाधारण महिलांसाठी १५ ग्रामपंचायत आरक्षित असून १५ सरपंच पदे ही फक्त सर्वसाधारण साठी आहेत ही आरक्षण सोडत निघाल्यावर अनेक ठिकाणची सरपंच पदे आरक्षित झाल्याने इच्छुक दावेदारांची मात्र स्वप्नभंगल्याचे दिसून आले या आरक्षण सोडतीमुळे मात्र पुढील पाच वर्षासाठी यापुढे राजकीय खलबते मोठ्या प्रमाणात सुरू होतील असेही चित्र दिसून येत आहे

अनुसुचित जाती महीला साठी थेटेगव्हाण, उमरेवाडी, पिंपरवाडा, मोहखेड, कोळपिंपरी

अनुसूचित जमाती महिला करता आरक्षित नसणारी काठेवाडी हिंगणी खुर्द, चिखली, शिंगणवाडी

अनुसूचित जमाती महिला आंबेवडगाव

अनुसूचित जमाती महिला करता आरक्षित नसणारी धुनकवड

नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला करता मैंदवाडी, भोगलवाडी, बोडखा, तांदळवाडी, संगम, देवठाणा, फकीरजवळा, सुकळी

नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला करता आरक्षित नसणारी

व्हरकटवाडी, चिंचपूर, सुरनरवाडी, गोपाळपूर, कोयाळ, अमला- निमला, चोंडी

महिला करता आरक्षित सर्वसाधारण

चारदरी, भोपा, आरणवाडी, असोला, अवरगाव, चोरंबा, वाघोली,, घागरवाडा, हिंगणी बुद्रुक, खोडस,कुंडी, मोरफळी, रुईधारूर, गावंदरा, जहागीरमोहा

सर्वसाधारण

पहाडी दहिफळ, पहाडी पारगाव, तेलगाव,कोथिंबीरवाडी, चाटगाव, देवदहिफळ, आसरडोह, अंजनडोह, गांजपूर, कान्नापुर, कारी, कासारी, मुंगी, पांगरी, सोनीमोहा

# डॉक्टरांनी रुग्णावर व्यवसाय म्हणून नव्हे तर सेवा म्हणून उपचार करावेत - आ. सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

समाजामध्ये डॉक्टरांना देव मानले जाते. डॉक्टरांकडे गेल्यावर रुग्ण बरे होण्यासाठी काहीही करण्याची तयारी असते. मात्र आज अनेक ठिकाणी रुग्णांची लूट होत असल्याचे प्रकार अनेक ठिकाणी उघडकीस येत आहेत. त्यामुळे डॉक्टरांनी रुग्णावर व्यवसाय म्हणून नव्हे तर सेवा म्हणून उपचार करण्याचे आवाहन आ. सुरेश धस यांनी केले.

ते तालुक्यातील कडा येथील एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संत मदन महाराज संस्थांनचे अध्यक्ष बबन महाराज बहिरवाल, माजी आमदार साहेबराव दरेकर नाना, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, भीमराव पाटील, माजी सरपंच श्रीरंगराव कर्डिले आदी मान्यवर उपस्थित होते. आ. धस पुढे म्हणाले, आज समाजामध्ये ९० टक्के डॉक्टर चांगले काम करतात मात्र दहा टक्के डॉक्टर




चूकीची पध्दत अवलंबत असतात. कोरोना काळामध्ये डॉक्टरांची किंमत समाजाला कळाली असून लाखो लोकांना जीवदान देण्याचे काम डॉक्टरांनी केले आहे. यावेळी उद्धव बापू दरेकर, संदीप खकाळ, अनिल ढोबळे, संजय ढोबळे, संपत सांगळे, दीपक कर्डीले, बाळासाहेब कर्डीले, अंकुश चव्हाण, परमेश्वर शेळके, विजयकुमार बांदल, अब्दुल भाई सय्यद, विठ्ठलराव बांदल, डॉ. पंडित खिलारे, डॉ. महेंद्र पटवा, भगीरथ धारक, आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. ऋषिकेश ढोबळे यांनी आभार व्यक केले.

# आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मिळणार हक्काचे घर

पाटोदा (प्रतिनिधी)

काही शासकीय अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला मुलींच्या शाळांमध्ये कर्मचाऱ्याची राहण्याची गैरसोय होत होती व काही कर्मचारी निवासी व्यवस्था चा अभाव दाखवून काम चुकारपणा करत होते व विद्यार्थ्यांना त्यांच्या जडणघडणमध्ये विशेष लक्ष देता येत नव्हते ही बाब आमदार सुरेश आण्णा धस यांच्या लक्षात आ. सुरेश धस यांच्या शासकीय निवासी शाळेच्या आवारातच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कायमचे कायमचे हक्काचे निवासस्थान असावे म्हणून पाठपुरावा सतत करत होते. सदरील निवासी स्थान झाल्यामुळेयामुळे विद्यार्थ्यांवर योग्य संस्कार यावे विद्यार्थ्यांच्या.



सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनाने कला क्रीडा व इतर गुणांना वाव देण्याकरिता याचा खूप मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांचा संवाद वाढेल २४ तास विद्यार्थी शिक्षकांच्या नजरेसमोर राहील असे विविध फायदे यामुळे होणार आहेत ६.६७ कोटी पाटोद्यासाठी व ६.६७ कोटी शिरूर साठी आली व अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांचे नुकसान त्यांनी जाणवले. पाटोदा व शिरूर या ठिकाणी इमारतीच्या बांधकामासाठी कार्यसम्राट सुरेश आण्णा धस यांनी निधी मंजूर केला आहे. पाटोदा शिरूर हे काम मंजूर केल्यामुळे तालुक्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला मुलींच्या पालकाकडून सुरेश आण्णा धस यांचे कौतुक काचा वर्षाव होत आहे.. तरी शिक्षक व शिक्षक उत्तर कर्मचाऱ्यांची निवासी व्यवस्था व्हावी म्हणून रिपाईचे नेते डॉक्टर नरेंद्र जावळे व किशोर आडागळे नगरपंचायत सभापती पाटोदा यांनी सतत पाठपुरावा सुरेश आण्णा धस यांच्याकडे केलेला होता. व यामुळे आज आंबेडकर चळवळीतील सर्व कार्यकर्त्यांनी कार्यसम्राट सुरेश आण्णा धस यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे आभार मानले व छत्रपती शिवाजी महाराजांचे पुस्तक देऊन

# शेतकरी नेते जगदिश फरताडे व कवडगाव ग्रामस्थांच्या मागणीला यश

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यातील कवडगाव देवडी भागातील जवळपास २०ते२५गावांना बीड व माजलगावला जाण्यासाठी बससेवा सुरू नव्हती पर्यायाने या भागातील जनतेला जिल्हा आणि तालुक्याच्या ठिकाणी अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमधुन प्रवास करावा लागत होता ही बाब लक्षात घेऊन या भागातील शेतकरी चळवळीचे नेते जगदिश फरताडे व कवडगावचे सरपंच शे.बशीरभाई यांच्या शिष्टमंडळाने विभागीय नियंत्रक अनुजा दुसाने व बीड आगारप्रमुख संतोष डोके यांची प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदन देण्यात आले होते याच मागणीची दखल घेऊन या मार्गावर दि.१५ पासुन माजलगाव ते बीड मार्गे देवडी कवडगाव पिंपळनेर ई-बससेवा सुरू झाली आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की वडवणी तालुक्यातील जवळपास २०ते२५गावांना जिल्हा आणि तालुक्यातील ठिकाणी जाण्यासाठी दळणवळणाची कुठलीच सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता त्यामुळे गेल्या कित्येक दिवसांपासून या भागातील जनतेला बससेवा सुरू असणे ही गरज बनली होती बीड ते माजलगाव मार्गावर बीड पासुन ते माजलगाव पर्यंत अंथरवन पिंपरी तांडा नागापुर जवळा म्हाळसापुर ईट पिंपळनेर सांडरवण मुगगाव पाटेगाव सुरडी नबाबपुर बोरदेवी लिंबारुई मोरेवाडी कवडगाव देवडी ख.लिमगाव काडी वडगाव देवगाव खापर वाडी परडी माटेगाव लवुळ पात्रुड ढोरगाव अशी जवळपास २०ते२५गावांना या बसचा फायदा होऊन दळणवळणाचे साधन

## माजलगाव ते बीड मार्गे देवडी कवडगाव ई-बससेवा सुरू

उपलब्ध झाले आहे मात्र याच बसच्या फेऱ्या वाढविण्यात याव्यात अशी मागणी प्रवाशी जनतुन होत आहे भविष्यात आपण या बसच्या फेऱ्या निश्चितच वाढवु असे आश्वासन विभागीय उपनियंत्रक महाजन यांनी दिले ही बससेवा सुरू झाल्यानंतर प्रवाशांत आनंदाचे वातावरण पसरले आहे बस गावात आल्यानंतर कवडगाव देवडी येथील जनतेने चालक वाहक यांचा यथोचित सत्कार केला ही बससेवा सुरू करण्यासाठी शेतकरी चळवळीचे नेते जगदिश फरताडे कवडगावचे सरपंच शे.बशीरभाई माजी सरपंच मकसुदखान पठाण माजी सरपंच सुभाषराव साळवे शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष शेरुपटेल ग्रा पं सदस्य मकसुद पटेल दगडु कानडे बन्शीआप्पा लेंडाळ आदेश नांदुरकर मुदस्सरअली जहागीरदार शिवसेना गटनेते बाबासाहेब राऊत आशेफभाई इनामदार नरेंद्र काळे पाटील आबेद इनामदार देवीचे सरपंच अतुल झाटे मच्छींद्रबप्पा झाटे विश्वनाथ दादा झाटे विश्वासराव आगे भगवानराव कांबळे गितेशदादा आगे काडीवडगावचे सरपंच बालासाहेब राऊत राजाभाऊ बादाडे पुरुषोत्तम गिलबिले मोरेवाडीचे सरपंच लहुदादा काळे सुर्डीचे सरपंच बाबुराव मोरे बोर देवीचे सरपंच रविंद्र आडसुळ शत्रुघ्न डोंगरे परमेश्वर थोटे सुनिल दुबाले आदिनी प्रयत्न केले.

# भविष्यात येणाऱ्या निवडणुकीनां सामोरे जायचे आहे – संपर्कप्रमुख परशुराम जाधव




बीड /प्रतिनिधी

शिवसेनेत शिवसैनिक हे सर्वोच्च पद आहे, या पदाला कोणी हिरावून घेऊ शकत नही, म्हणून मी कोणी पदाधीकारी नाही असे म्हणून पक्ष कार्य थांबवू नका. येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीला सामोरे जायचे आहे त्या उद्देशाने तयारीला लागण्याच्या सूचना आज संपन्न झालेल्या आढावा बैठकीत संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव यांनी दिल्या.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची आज जिल्हा आढावा बैठक पार पडली. संपर्क प्रमुख परशुराम जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रत्येक पदाधिकारी आपले मनोगत, समस्या, अडचणी मांडत होता. त्या संपर्क प्रमुखांनी समजून घेऊन नोंदी करून घेतल्या. निवडणूका या खर्चिक जरी असल्या तरी शिवसैनिक हा जणसामान्यात ला असल्यामुळे त्याची एक वेगळी ओळख आहे. उमेदवारी व त्यांच्या ए बी फॉर्म ची निवड स्वतः पक्ष प्रमुख उद्धव साहेब हेच करणार असल्याचे संपर्क प्रमुख म्हणाले.

येणारी निवडणूक प्रत्येकाला विश्वासात घेऊन लढायची आहे, जे येतील त्यांना घेऊन, जे येणार नाहीत त्यांना सोडून येणारी निवडणूक लढणार आहोत, जागांची चाचपणी सुरु आहे, आवश्यक त्या ठिकाणी ताकत लावली जाईल असे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम म्हणाले.

शिवसंग्राम चे तालुका अध्यक्ष, पूर्वाश्रमीचे शिवसैनिक तथा माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे यांचा शिवसेनेत संपर्क प्रमुख परशुराम जाधव यांनी प्रवेश घेतला.

यावेळी प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख मीराताई नवले , युवासेना प्रमुख अभिषेक दिवे , जिल्हासमन्वयक संजय महाद्वार , जिल्हासंघटन नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप , राजूभाऊ महुवाले, आशिष मस्के , आदिनाथ खेडकर, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर , कामगार सेनेचे रवि वाघमारे, आष्टी तालुकाप्रमुख सुभाष राऊत , पाटोदा तालुका प्रमुख मुकुंद शिंदे , शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे ,गेवराई तालुकाप्रमुख अजय दाभाडे, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे , दादासाहेब सोनवणे, नंदू जोगदंड, अनिल माने, देवसिंह भिषेन, अक्षय सारणे, उपसरपंच प्रदीप कोटुळे, कृष्णा चौरे,अजिंक्य डोरले सचिन वनवे, सोमनाथ लवूळ अशोक घोशीर ,आकाश कांकरिया ,महेश एकशिंगे, रामदास मोहिते ,शिवाजी थोरवे बाबुराव काळे, सचिन अमन साईनाथ ढाकणे, नामदेव आघाव, नारायण आघाव , राम सापते ,अक्षय काशीद, रंगनाथ पैठणकर

# देसूर ग्रामपंचायत अंतर्गत झालेले विविध विकास कामाच्या चौकशी न झाल्याने लहु भवर यांच्यासह ग्रामस्थांचे आमरण उपोषण




# ग्रामपंचायतच्या बोगस कामाविरुद्ध सदस्यांसह ग्रामस्थांचे आमरण उपोषण

आष्टी /प्रतिनिधि

तालुक्यातील देसूर ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन मिशन, १३ व १४ वा, १५ वा वित्त आयोगामार्फत सर्व फंड व रो.ह.यो. अंतर्गत झालेल्या सर्व कामे केलेले आहेत असे दाखविण्यात आलेली आहे.सद्य स्थितीत कामे न करता फक्त कागदावरच काम पूर्ण झाले आहेत. प्रत्यक्ष कामे झाले नसून ग्रामसेवक सरपंच यांनी भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप करत संपूर्ण कामांची समिती नेमून चौकशी करण्यात यावी व दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी लहू भवर यांनी करून देखील प्रशासनाने कारवाई न केल्याने ग्रामपंचायत सदस्य लहू भवर यांच्यासह देसूर ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालयासमोर मंडळवारी सकाळी आमरण उपोषण सुरू केले आहे.

तालुक्यातील देसूर ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या कामाची चौकशी करण्यात यावी तेरावा चौदावा पंधरावा वित्त आयोग अंतर्गत झालेल्या निधीची चौकशी करण्यात यावी रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या व चालू असलेल्या कामाची चौकशी करण्यात यावी घनकचरा योजनेमध्ये अनियमितता भ्रष्टाचार झालेला आहे त्याची चौकशी करण्यात यावी तात्काळ चौकशी समिती नेमून समितीमध्ये सक्षम अधिकारी घेण्यात यावेत व संबंधित ग्रामसेवक अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा गेल्या दहा ते पंधरा वर्षापासून स्थानिक ग्रामसेवक असल्यामुळे गोरगरीब शेतकऱ्यांची कामे होत नाहीत यांची तात्काळ बदली करण्यात यावी या मागणीसाठी लहू भवर यांच्यासह परसराम भगत,शरद भवर,समाधान भवर, राजेंद्र भवर, अशोक भवर,

# धर्माबाद शहर व ग्रामीण भागातील एक डझन बार बंद

## महाराष्ट्र शासनाच्या अन्यायकारक आबकारी धोरणाच्या विरोधात जाहीर निषेध!

धर्माबाद- अशोक पडोळे

महाराष्ट्र शासनाच्या अन्यायकारक अडकारी धोरणाचा व वॅट टॅक्स वाढीचा जाहीर निषेध म्हणून महाराष्ट्रात इंडियन हॉटेल्स अँड रेस्टॉरंट या आहार संघटना असोसिएशनने आज बंद पुकारला होता. त्या पार्श्वभूमीवर धर्माबाद शहरी व तालुक्यात बार अँड रेस्टॉरंट असोसिएशनचे सर्व सदस्यांनी म्हणजेच तब्बल १२ बार बंद करून शासनाचा तीव्र निषेध केला.

शासनाने उत्पादन शुल्कात ६० टक्क्यांनी वाढ केली असून व्याट टॅक्स ५% वरून दहा टक्के पर्यंत वाढवली आहे. तसेच नूतनीकरण शुल्कात १५ टक्क्यांनी वाढ केली आहे. यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील हॉटेल व बार व्यवसाय अडचणीत आले असून मध्यम व छोटे दर्जाचे हॉटेल्स आणि बार बंद होण्याची शक्यता जाणकाराकडून वर्तवण्यात येत आहे.

या शासनाच्या अन्यायकारक धोरणाच्या विरोधात इंडियन हॉटेल्स अँड रेस्टॉरंट या आहार संघटनेने दिनांक १४ जुलै रोजी राज्यव्यापी बंदची घोषणा केली असून त्यांच्या समर्थनात आज धर्माबाद शहर व ग्रामीण भागातील सर्व बार बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी धर्माबाद च्या उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.या वेळी ज्येष्ठ बारचालक सुरेश पाटील, बार असोसिएशनचे अध्यक्ष रमेश आण्णा गौड, संघटनेचे सदस्य दत्ता गौड, संतोष रेड्डी, माधव पाटील सोनटक्के, विवेक




हंपोले, अनुप रेड्डी यांच्यासह सर्व बार अँड रेस्टॉरंटचे चालक-मालक उपस्थित होते.महाराष्ट्र शासनाच्या अन्यायकारक अबकारी धोरणाचा व व्याट टॅक्स वाढीचा निर्णय हा सर्व बार अँड रेस्टॉरंट मालकावर अन्याय करणारा असून याबाबतीत इंडियन हॉटेल्स अँड रेस्टॉरंट या आहार संघटनेच्या माध्यमातून न्यायालयात आम्ही दाद मागणार असून त्या पार्श्वभूमीवर आज उपरोक्त महाराष्ट्र व्यापी निषेध आंदोलनात धर्माबाद तालुक्यातील सर्व बार अँड रेस्टॉरंट सहभागी झाले ही अभिमानास्पद गोष्ट असल्याचे बार असोसिएशनचे अध्यक्ष रमेश आण्णा गौड यांनी प्रसारमाध्यमाशी बोलताना सांगितले.

# छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी आवाहन

बीड ।प्रतिनिधी

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत दहावीमध्ये ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप ओगले यांनी केले आहे.

# राज्य शासनाच्या 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४'साठी

## प्रवेशिका पाठविण्याकरिता १९ जुलै पर्यंत मुदतवाढ

लातूर ।प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता दि. १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत.

# आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ठाकरे शिवसेनेचाच झेंडा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज रहावे – जाधव,वरेकर

बीड ।प्रतिनिधी

येत्या दोन महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका पार पडणार आहेत. त्यासाठी आजपासूनच प्रतेक गट ,गण व वार्डात आपला संभाव्य उमेदवार आपल्याला तयार करून ठेवायचा आहे.ज्यांना निवडणुक लढवायची आहे त्यांनी आजपासूनच कामाला लागून लोकांच्या संपर्कात रहायचे आहे.पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकायचे स्वप्न पूर्ण करून ठाकरे शिवसेनेचा झेंडा फडकवण्यासाठी निष्ठावंत शिवसैनिकांनी सज्ज व्हावे असे आवाहन ठाकरे शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब आणि बीड जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी केले आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायक राऊत साहेब,संपर्कनेते सुनिल प्रभू साहेब, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली आज बीड व माजलगाव मतदार संघातील पदाधिकारी व शिवसैनिक यांची आढावा बैठक संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ




वरेकर, माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर , महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका प्रमिलाताई माळी , जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके , तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन , वडवणी तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, धारूर तालुकाप्रमुख बाबा सराफ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बीड शहरातील सिद्धी विनायक कॉम्प्लेक्स येथील मध्यवर्ती कार्यालयात संपन्न झाली.यावेळी पुढे बोलताना संपर्कप्रमुख परशुराम जाधव व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर म्हणाले की,महाराष्ट्रातील महायुतीच्या शासनाने दिलेल्या फसव्या आश्वासनाचा जनतेपुढे पदार्पश करा , शेतकऱ्यांना या शासनाने दिलेल्या फसव्या आश्वासनाचे काय झाले याचा पाढा जनतेसमोर वाचून दाखवा , उद्धवसाहेब ठाकरे मुख्यमंत्री असताना केलेल्या कामाचं अवलोकन जनतेसमोर करा , एकंदरीत केंद्रातील व महाराष्ट्रातील हुकुमशाही असलेल्या सरकारला वठणीवर आणण्यासाठी येणाऱ्या निवडणुकीत विजय प्राप्त करण्यासाठी एकदिलाने कामाला लागण्याचे आवाहन संपर्कप्रमुख जाधव व जिल्हाप्रमुख वरेकर यांनी पदाधिकारी व शिवसैनिकांना केले.यावेळी जिल्हा संघटक ज्ञानेश्वर जाधव,सहसचिव श्रीकृष्ण गायके, विधानसभा प्रमुख नामदेव सोजे,बीड तालुका सचिव नंदु येवले , अल्पसंख्याक बीड तालुकासंघटक नसीर पठाण, युवा सेना वडवणी तालुकाप्रमुख नवनाथ मोरे,महिला आघाडीच्या वडवणी तालुकाप्रमुख कौशल्या कदम, महिला आघाडीच्या माजलगाव तालुकाप्रमुख सुनिता जाधव , वडवणी महिला शहरप्रमुख शेषीकला अवचार,आशाताई लोखंडे,युवराज शिंदे, अशोक गोंडे ,बीड उपतालुकाप्रमुख अशोक सगळे, बीड उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, बीड तालुका संघटक महादेव मुळे, बीड तालुका संघटक गोरख कदम, सहसचिव संदिप भानप ,भरत खरात , दिपक कांबीलकर,कलिमभाई पठाण , दत्ता सुरवसे , उद्धव काकडे, भैय्या खोसे,वचिषट शेंडगे,विलास निपटे ,अंतिम पठाण,रवि म्हात्रे, शेख सादेक, शेख पठाण, आबासाहेब म्हात्रे,अशा राठोड, शितल कांबळे, सिंधुताई उजगरे, ज्ञानेश्वर सिंघन, अशोक जाधव,रामा जाधव, प्रवीण भोसले यांच्यासह बीड व माजलगाव मतदार संघातील पदाधिकारी व शिवसैनिक, महिला आघाडीच्या पदाधिकारी, युवासेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**बीड – शिवसंग्रामचे तालुका अध्यक्ष, पूर्वाश्रमीचे शिवसैनिक तथा माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे यांचा शिवसेनेत संपर्क प्रमुख परशुराम जाधव यांनी प्रवेश घेतला. यावेळी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे, युवासेना जिल्हा संघटक अभिषेक दिवे, महिला आघाडी जिल्हा संघटक मीराताई नवले सह शिवसैनिक.**

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक तयारीचा विभागीय आयुक्तांकडून आढावा

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक तयारीचा जिल्हानिहाय आढावा घेतला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत मतदान केंद्राची संख्या निश्चित करताना काळजीपूर्वक निश्चित करा, असे निर्देश त्यांनी दिले.विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीला अपर आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, नगरविकास विभागाचे सह आयुक्त देविदास टेकाळे, सहायक आयुक्त संजय केदार तसेच दुरदृश्य प्रणालीद्वारे विभागातील सर्व जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह नगरप्रशासन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान विभागीय आयुक्त श्री पापळकर यांनी जिल्हानिहाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक तयारीबाबत माहिती जाणून घेतली. मतदार संख्या, इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम), मतदान केंद्रांची व्यवस्था आणि इतर अनुषंगिक तयारी मतदान केंद्रांची रचना आणि निवडणूक प्रक्रियेच्या तयारी, मतदान केंद्रांवर पाणी, वीज, स्वच्छतागृहे यासारख्या मूलभूत सुविधा,

ईव्हीएम सुरक्षितता आदी तयारीचा आढावा घेत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित व्यवस्थेची पाहणी करावी, असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी सबंधित विभागाचे अधिकारीही उपस्थित होते.

# मातोश्री शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याची मुदत

बीड ।प्रतिनिधी

मातोश्री शासकीय ईबीसी मुलांचे वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांनी १५ ते ३१ जुलै, २०२५ या कालावधीमध्ये अर्ज सादर करावेत, असे आवाहन वसतिगृहाच्यावतीने करण्यात आले आहे. माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालय, आयटीआय, तंत्रनिकेतन आदी ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश दिला जातो. मागील वर्षात वसतीगृहात प्रवेश असलेल्या विद्यार्थ्यांना पुनर्प्रवेशासाठी ६० टक्के गुण आवश्यक आहेत.प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी ३१ जुलै, २०२५ पर्यंत विहित नमुन्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्ट्या वगळता) सादर करावेत. त्रुटी असलेले, अपूर्ण अर्ज व अंतिम तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

# राज्य सेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढा – जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड ।प्रतिनिधी

नागरिकांना शासकीय सेवा जलद, पारदर्शकपणे आणि कालमर्यादेत मिळण्यासाठी राज्यसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्यानुसार नागरिकांना शासकीय सेवा विहित वेळेत मिळण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणे विहित कालमर्यादेत तातडीने निकाली काढावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राज्यसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांच्यासह सर्व संबधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन यांनी विविध विभागांद्वारे निपटारा झालेली प्रकरणे आणि प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला. तसेच सर्व कार्यालयाच्या सूचना फलकावर महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ प्रसिद्ध करण्यात यावा. पोर्टलवरील प्राप्त तक्रारी विहित वेळेत निकाली काढाव्यात. प्रलंबित तक्रारीचा व निकाली काढलेल्या तक्रारींचा अहवाल कार्यालय प्रमुखांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयास वेळेत सादर करावा, अशा सूचनाही कार्यालय प्रमुखांना जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी केल्या.


हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# टरबुजाचे बियाणे निघाले बोगस, शेतकऱ्यांनी दिला आंदोलनाचा इशारा



पाथरी /प्रतिनिधी

पाथरी तालुक्यातील उमरा, गौंडगाव, गुंज, कोल्हावाडी रत्नापूर या शिवारात शेतकऱ्यांनी लागवड केलेले टरबूज बियाणे बोगस निघाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून बियाणे कंपनीकडून नुकसान भरपाई देण्याची मागणी करत शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

तालुक्यातील भोई समाजातील व इतर शेतकऱ्यांनी ही लाईट सीड्स सुरुची या संकरित टरबुज बियाणांची लागवड जानेवारी आणि फेब्रुवारी या महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात केली होती. परंतु बोगस बियाणे असल्यामुळे टरबूज लहान अवस्थेत असतानाच सुकून गेले तसेच कलिंगडाचा टरबूज १ किलो वजनाचे असताना सर्व विले सुकून गेले टरबूज चा रंग काळा न होता तो हिरवा पट्टा निघाला देखील आत मध्ये हिरवा निघाला त्यामुळे एकाही व्यापाऱ्याने टरबूज खरेदी केले नाही, शेतकऱ्यांना शेतातच टरबुज खराब होताना पाहावे लागले या प्रकरणी कंपनीच्या एजंट आणि दुकानदाराशी संपर्क केला आमच्या असे निदर्शनस आले की कंपनीचे प्रतिनिधी काही शेतकऱ्यांना रुद्रा पॅलेस ढाबा या हॉटेलवर त्यांनी जेवणासाठी बोलावलं त्यांनी काही शेतकऱ्यांना त्यांनी चिरीमिरी देऊन पडदा पाडण्याचे काम केले आहे उडवाउडवीची उत्तरे दिली. कंपनीने नुकसान भरपाई द्यावी अन्यथा आंदोलन करू असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. याबाबत तालुका कृषी अधिकारी कार्यालयासह जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय येथे त्यांनी निवेदन दिले आहे. यावेळी रमेश बिजुले, दत्ता शालीवान बिजुले, जालिंदर बिजुले, आसाराम बिजुले, संतोष बिजुले, बालासाहेब बिजुले, अर्जुन मारुती, दत्ता धोंडीबा बिजुले,सटवा बिजुले, रामप्रसाद बिजुले आदी १०० शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जि.प.मुलींचे हायस्कूल गुणवत्तेसह विविध उपक्रम राबविणारी सर्वोत्तम शाळा - डॉ.दिलीप पुंडे

मुखेड / प्रतिनिधी

पिएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल मुलींचे मुखेड ही गुणवत्तेसह विविध उपक्रम राबविणारी महाराष्ट्रातली सर्वोत्तम शाळा म्हणुन सर्वदूर परिचित आहे.येथे जवळपास १ हजार ६०० विद्यार्थ्यांची संख्या आहे.येथे तुम्ही विविध उपक्रम राबवता ही खुप चांगली बाब आहे.एकीकडे इंग्रजी शाळांकडे ओघ वाढला आहे.इंग्रजीही शिकली पाहिजे पण आपली माय मराठी मातृभाषा दुधाची भाषा विचाराची भाषासुद्धा टिकली पाहीजे या शाळेमध्ये राष्ट्रगीताबरोबरच तुकोबाचे अभंगही मुलांच्या ओठाला तुम्ही चिटकवत आहात आपल्या संस्कृतीचे संवर्धनही होत आहे हे अत्यंत आनंदाची बाब आहे.इथे छोट्या छोट्या बालिका पाहून मला खूप आनंद झाला बापाची लाडकी लेक असते कुठलाही बाप मुलापेक्षा लेकीचा लाड जास्त करतो.शिक्षण म्हणजे विकासाचा राजमार्ग होय त्यांचे सारथी म्हणजे गुरुजन असतात. विद्यार्थ्यांनो तुम्ही शिकुन खुप मोठे व्हा.शिक्षकांनी आपल्याकडे असलेल्या ज्ञानाचे दान विद्यार्थ्यांना करुन त्यांना घडविण्याचे मोठे काम आपल्या हातुन करावे कारण शिक्षकाच्या अकाउंटला किती रुपये आहेत ते महत्त्वाचे नसते तर त्यांनी घडवलेले गुणवान विद्यार्थी हेच त्यांच्या अकाउंटचे बॅलन्स असते असे प्रतिपादन मुखेडभुषण डॉ. दिलीपराव पुंडे यांनी जि.प. मुलींचे हायस्कूलमध्ये आयोजीत आरोग्य शिबीर कार्यक्रमात बोलताना केले.

पिएमश्री योजनेतुन आयोजीत करण्यात आलेल्या आरोग्य शिबीराची सुरूवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दिपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी स्वागत गीताच्या माध्यमातून उपस्थितांचे स्वागत केले.सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जागतिक आरोग्य संघटनेचे सदस्य डॉ.दिलीप पुंडे हे होते तर उदघाटक म्हणून गटशिक्षण अधिकारी हामिद दौलताबादी., प्रमुख अतिथी आयएमए आरोग्य संस्थेचे अध्यक्ष डॉ.रामराव श्रिरामे,डॉ. एम.जे.इंगोले,शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजीराव येवतीकर,डॉ.शिवाजी कराळे, मुख्याध्यापक डी.जे.कांबळे, दतंरोगतज्ञ डॉ.पांडुरंग श्रिरामे, डॉ.व्ही.टी.शेटवाड,डॉ.प्रशांत खंडागळे,डॉ. सतिश धमणे, डॉ.संदीप ढगे,डॉ.सौ.प्रिया खडांगळे,डॉ.किरण ठाकरे, डॉ.जावेद शेख,डॉ.सुरेखा पेरके, शिक्षक संघटनेचे




जिल्हा कोषाध्यक्ष दिपक लोहबंदे,शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्षा सौ.उर्मिला गिते,सुनिल तरगुडे, श्रिदेवी पांचाळ,भवानिसींह चौहाण,संजय यलमवाड,संजय बिडवई,मुखेड उपजिल्हा रुग्णालयातील शौकतअल्ली बेग,शहानवाज शेख,संजयकुमार फुले,किरण पवार,दिनेश राठोड, भगवान पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.शिबिरामध्ये डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केल्यानंतर मोफत औषधी देण्यात आले.कार्यक्रमाच्या सुरूवातीस मान्यवरांचे ढोल ताशाच्या गजरात विद्यार्थ्यांने लेझीम पथकाच्या माध्यमातून जोरदार स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सांस्कृतिक विभागप्रमुख दिलीप देवकांबळे व सहशिक्षिका सौ.सुरेखा हराळे यांनी केले तर प्रस्ताविक मुख्याध्यापक डी.जे. कांबळे यांनी केले.उपस्थितांचे आभार शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेताब शेख यांनी मानले.यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक,शिक्षिका,शिक्षकेत्तर कर्मचारी व शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी,सदस्य तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# आईच्या स्मरण दिनी केले शाळेतील मुलांना अन्नदान

मुक्रमाबाद / प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील प्रसिद्ध व्यापारी तुळशीराम गुंडेराव वट्टमवार यांचे चिरंजीव सुप्रसिद्ध व्यापारी विकास तुळशीराम वट्टमवार यांनी आईच्या पुण्य स्मरण दिनी सतत तीन वर्षांपासून हा एक आगळा वेगळा कार्यक्रम आयोजित करत आहेत. मुक्रमाबाद येथील असंख्य विद्यार्थी टॉपवर असलेल्या श्री छत्रपती संभाजी विद्यालयामध्ये वट्टमवार परीवारांनी स्व.सौ.कुसुमबाई तुळशीराम वट्टमवार यांना पाचव्या पुण्यस्मरण निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.



यावेळी श्री छत्रपती संभाजी विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष श्री गजानन पाटील गोजेगावकर व श्री शाळेचे मुख्याध्यापक श्री बालाजी भाहेगावे सर, श्री खंकरे सर, गावातील उपसरपंच सदाशिव बोयेवार, पत्रकार बस्वराज वंटगिरे,अरुण गुंडेराव वट्टमवार,विकास तुळशीराम वट्टमवार, योगेश दिलीप वट्टमवार, साईनाथ अरूण वट्टमवार व सर्व परीवार आणि शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर विध्यार्थी उपस्थित होते.

# दिवंगत पत्रकारांच्या नावे स्तंभ बनवा–विकासकुमार बागडी

डॉ आशिष तिवारी/जालना –

जालना शहरात दिवंगत पत्रकारांच्या नावे एकही स्तंभ नसून या पत्रकारांचे मोलाचे योगदान राहिलेले असून त्यासाठीच त्यांच्या ही नावे शहरात एखादा तरी स्तंभ असावा आणि तो जालना शहर महापालिकेकडे व्हाईस ऑफ मिडियाचे प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांनी केली आहे.

यासंदर्भात बागडी यांनी म्हटले आहे की, जालना जिल्ह्यात सामाजिक आणि राष्ट्रीय काम करणारे सामाजिक कार्यकर्ता, राजकीय कार्यकर्ता, स्वातंत्र्य सैनिक, उद्योजक, माजी सैनिक



आदींच्या नावाने शहरात अनेक रस्ते, चौक, कमान बांधण्यात आलेले आहेत. पण या सर्वांची कामाची प्रसिध्दी करणारे चौथा स्तभ म्हणजेच पत्रकारितेच्या नावे कुठेही आणि कोणत्याही चौकात किंवा रस्त्यावर एकही स्तभ नाही. जालना शहराच्या मध्यभागी म्हणजेच टाऊन हॉल येथे पत्रकारांसाठी स्वतंत्र स्तंभ उभारण्यात यावा, जिल्ह्यात दिवंगत झालेल्या पत्रकारांच्या नावे असा पत्रकार स्तंभ असेल तर तो चांगलाच आहे.

शशिकांत पटवारी, उदय पटवारी, लक्ष्मण पायगव्हाणे, गणेश जळगांवकर, सतीष सुदामे, दिगंबर शिंदे, रमण गायकवाड, मनोहर बुजाडे, श्रीकृष्ण भारुका, शेख अलीम, अबुल हसन, राजेंद्र तिरुखे, लक्ष्मीनारायण पिपरिये, लक्ष्मीनारायण गौड, सुरेंद्र जैस्वाल, रतनलाल कुरिल, चंद्रकांत शहाणे, अनिल खंदारे आदी अनेक पत्रकार असे आहेत की, त्यांनी आपले संपूर्ण जीवन पत्रकारितेला वाहिले, परंतू त्यांच्या नावाने शहरात एखादाही स्तंभ असू नये, ही खेदाची बाब म्हणावी लागेल. म्हणूनच या सर्व दिवंगत पत्रकारांची आठवण म्हणून तरी जालना शहर महानगर पालिकेने एखादा स्तंभ शहरात उभारावा, अशी विनंतीही व्हाईस ऑफ मिडियाचे प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांनी केली आहे.

# पो.नि.मारुती मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली ट्युशन क्लास संचालकांसोबत शिस्त आणि सुरक्षेविषयी बैठक

देगलूर /प्रतिनिधी

देगलूर : शहरातील काही ट्युशन परिसरात विद्यार्थ्यांच्या वर्तनाबाबत झालेल्या तक्रारी, तसेच काही बेफिकीर वाहनचालकांमुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता देगलूर पोलिसांनी आता सजग पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ज्येष्ठ पत्रकार निवृत्ती भागवत यांनी यासंदर्भात समाजमाध्यमांद्वारे आणि वृत्तपत्रात आवाज उठवल्यानंतर प्रशासनाने याची दखल घेतली आहे.आज दिनांक १५ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ ते १२.१५ या वेळेत देगलूर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मारुती मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस स्टेशनच्या मध्ये खाजगी ट्युशन




क्लासेसच्या संचालकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. शहरातील शैक्षणिक वातावरण शिस्तबद्ध आणि सुरक्षित राहावे, यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह रॅगिंग, छेडछाड, पार्किंगची अडचण, सीसीटीव्ही बसविण्याची गरज, विद्यार्थ्यांच्या शिस्तीचा अभाव, संस्कारक्षम शिक्षण यावर मंथन करण्यात आले. याशिवाय, ट्युशन क्लासेसनी पोलिसांशी सतत संपर्कात राहण्यासाठी व्हाट्सॲप ग्रुप सक्रीय ठेवण्याचा सल्लाही देण्यात आला.विशेषतः व्यसनमुक्तीसाठी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे आणि पालकांशी संवाद ठेवणे यावर भर देण्यात आला.

या बैठकीस दीक्षित अकॅडमी, रेडी सर क्लासेस, राठोड सर क्लासेस, सेवा अकॅडमी, हळीकर क्लासेस, बिरादार कोचिंग क्लासेस, एबीसी क्लासेस, आयडियल अकॅडमी, दवे सर क्लासेस, साधना क्लासेस आदी नामांकित संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास आणि सुरक्षा हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यासाठी सर्व कोचिंग संस्थांनी पुढाकार घेऊन सहकार्य करावे, असे स्पष्ट मत यावेळी पोलिस निरीक्षक मारुती मुंडे यांनी व्यक्त केले.




**बाबाजानी दुर्राणी यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गरजू महिलांना राशन किड वाटप**

पाथरी : माझी आमदार बाबाजानी दुर्राणी यांच्या वाढदिवसानिमित्त पाथरी शहरातील पी. एम. श्री. ब्रांच स्कूल येथे, त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला तसेच त्यांचा हस्ते शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले, व गरजू महिलांना राशन किड चे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन माझी नगराध्यक्ष एम.ए. मोइज मास्तर यांच्या वतीने करण्यात आले. या वेळी दत्ता महेंद्र, मुजाहिद खान, जमील रहमान अन्सारी, अनिस फारुकी, मिर्झा रशीद बेग, बबलू कुरेशी, आवेस अन्सारी, जब्बार अन्सारी, डॉक्टर तोफिक, ॲड. यया, मुखीत जागीरदार, आदी आदी मान्यवरांसमवेद प्रभागातील बहुसंख्य नागरी व शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गौण खनिजाच्या अवैध उत्खननाप्रकरणी २८.५० कोटींचा दंड

## परभणी जिल्ह्यातील गौरमधील प्रकार

### महसूल मंत्र्यांची धडाकेबाज कारवाई

मुंबई - परभणी जिल्ह्यातील गौर येथे ४९ हजार ९९४ ब्रास गौण खनिजाचे विनापरवानगी उत्खनन झाल्याचे आढळले असून, २८ कोटी ४९ लाख ७१४ रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. १७ जुलैपर्यंत दंड न भरल्यास जप्तीची कारवाई केली जाईल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले. पूर्णा तालुक्यातील गौर येथे गौण खनिज (वाळू) च्या अवैध उत्खननाचा मुद्दा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सभागृहात उपस्थित केला होता.

दानवे यांनी गौर येथील अवैध खननाचा मुद्दा मांडत स्थानिक प्रशासनाच्या निष्क्रियतेवर बोट ठेवले होते. यावर उत्तर देताना महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले, विरोधी पक्ष नेत्यांच्या या प्रश्नावर नंतर चौकशी झाली. आपण तिकडे भेट दिली होती. आपल्या भेटीदरम्यान आणि त्याच्यापूर्वी आम्हाला आढळलं की, विनापरवानगी उत्खनन केलं गेलं आहे. दंडाची रक्कम आकारण्यात आली असून

१७ जुलै पर्यंत दंडाची रक्कम भरण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे. ही रक्कम न भरल्यास जप्तीची कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यापूर्वी अवैध खननाविरोधात कठोर पावले उचलण्याचे निर्देश दिले असून, ड्रोन सर्वेक्षण आणि इलेक्ट्रॉनिक ट्रान्सपोर्ट परमिट्स यांसारख्या उपाययोजनांचा वापर केला जात आहे. गौर येथील तपासादरम्यान अवैध खननाचे पुरावे मिळाल्याने ही कारवाई गतीमान झाली आहे. तसेच, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर धोरणे आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याचे सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. या कारवाईमुळे अवैध खनन करणाऱ्यांना जरब बसेल असेही महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले.

परभणी जिल्ह्यातील गौर येथे ४९ हजार ९९४ ब्रास गौण खनिजाचे विनापरवानगी उत्खनन झाल्याचे आढळले असून, २८ कोटी ४९ लाख ७१४ रुपये दंड ठोठावण्यात आला आहे.

# पालकाच्या मृत्यूप्रकरणात निवेदन सादर करा




परभणी /प्रतिनिधी

परभणी तालुक्यातील उखळद येथील ह भ प जगन्नाथ महाराज हेंडगे यांचा खून करणाऱ्या संस्थाचालकाला अटक करा अशी मागणी आ.डॉ.राहुल पाटील यांनी विधानसभेत करताच विधानसभा अध्यक्षांनी हा प्रकार गंभीर असून यावर तात्काळ शासनाने निवेदन सादर करावे अशा सूचना दिल्या आहेत.

परभणी तालुक्यातील उखळद येथील ह भ प जगन्नाथ महाराज हेंडगे हे झिरो फाटा येथील हायटेक निवासी विद्यालयात मुलीची टी.सी. आणण्यासाठी गेले असता तेथे त्यांना संस्थाचालक प्रभाकर चव्हाण आणि त्याची पत्नी रत्नमाला चव्हाण या दोघांनी अमानुषपणे मारहाण केली यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला या प्रकरणात पूर्णा पोलीस ठाण्यात संस्थाचालक पती-पत्नीवर खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. तेव्हापासून दोन्ही आरोपी फरार आहेत त्यामुळे आ.डॉ. राहुल पाटील यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात मंगळवारी हा मुद्दा उचलून धरला.शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी ही घटना असून खून करणाऱ्या फरारी पती-पत्नीला अटक कधी करणार आणि त्या वादग्रस्त संस्थेवर बंदी घालणार का असा प्रश्न आ. पाटील यांनी आज विधानसभेत उपस्थित केला.त्यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी याची दखल घेत हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे शासनाने बुधवार सायंकाळपर्यंत यावर आपले निवेदन सादर करावे अशा सूचना शासनाला दिल्या आहेत. आ.पाटील यांनी विधानसभेत या प्रकरणावर आवाज उठवला आहे.

# अक्षया समूहातर्फे अहिल्याबाई होळकर जीवन कार्यावर रामकृष्ण नगरमध्ये कीर्तन



परभणी (प्रतिनिधी): अक्षया या जीवनमूल्ये जपणाऱ्या जागृत मातांच्या समूहातर्फे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन कार्यावर आधारित ह.भ.प.श्रीमती उज्वलाताई मुळे यांच्या मधाळ वाणीतून कीर्तनाचा कार्यक्रम

दि.१२ जुलै रोजी परभणीतील रामकृष्ण नगर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात संपन्न झाला.

नाविण्यपूर्ण कार्यक्रमांच्या शृंखलेत अक्षया समूहाच्या संयोजिका सौ. वैशाली सुनील पोटेकर यांच्या संकल्पनेतून हा आणखी एक उपक्रम सुमारे १५० महिलांनी मंत्रमुग्ध होऊन या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

याप्रसंगी रामकृष्ण नगर येथील श्रीमती लक्ष्मीबाई भारस्वाडकर यांचा सत्कार करण्यात आला.

कीर्तन कार्यक्रमात हार्मोनियमवर श्री. कृष्णा त्रीनगरे यांनी सेवा दिली. तबल्यावर साथ देणारे श्री. राधेय सातोनकर हे होते.

रांगोळी सेवा पूजा कोमटवार हिने दिली.

या प्रसंगी सौ.मीनाक्षी कुलकर्णी, सौ. रोहिणी मेथेकर, सौ. मीना शांडिल्य, सौ. छाया चापके, सौ. प्रेमीला पाटील, सौ. प्रीती देशमुख, सौ. मंदा फुटाणे, नंदा कवठेकर, सौ. संपदा दीक्षित, सौ. रेखा श्रीनगरे, सौ.अनिता रेवलकर, सौ. वैशाली डोईफोडे, सौ. आशा पाटोदकर, गीता सरदेशपांडे, सौ. अलका वाघमारे या उपस्थित होत्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. वैशाली पोटेकर यांच्या सोबत सौ. रोहिणी मेथेकर यांनी परिश्रम घेतले.

# वडवणीत बोगद्याच्या मटेरियलवरून भू-भाडे व मावेजा मिळावा यासाठी दुटाळ कुटुंबाचा आमरण उपोषणाचा इशारा

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यातील गट नंबर १११, ११० व १६० मधील जमिनीवर बोगद्याचे मटेरियल टाकण्यात आले असून, संबंधित शेतकऱ्यांना अद्याप भू-भाडे व मावेजा मिळालेला नाही. या पार्श्वभूमीवर दुटाळ कुटुंबाने प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही यासंदर्भात कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने १५ जुलै २०२५ रोजी आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे.

गट क्र. १११ मधील ०६ गुंठे जमीन अमोल बाबुराव दुटाळ यांच्याकडून पाटबंधारे विभागाच्या कालवा प्रकल्पासाठी २० जानेवारी २०२० रोजी संपादित करण्यात आली होती. परंतु आज पावेतो त्याचा मावेजा देण्यात आलेला नाही. तसेच गट क्र. ११० व १६० मधील भूभागात बोगद्याचे मटेरियल टाकण्यात आले असून त्या क्षेत्राबाबतचे भू-भाडे देखील अद्याप प्राप्त झालेले नाही.

या संदर्भात प्रयागाबाई मुक्ताजी दुटाळ, संगिता बाबुराव दुटाळ व अमोल बाबुराव दुटाळ यांनी आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी माजलगाव, तहसीलदार वडवणी व कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग बीड यांच्याकडे ०७१२०२५ रोजी लेखी निवेदनाद्वारे आपली व्यथा मांडली आहे.जर १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत भू-भाडे व मावेजा मिळाला नाही, तर १० ऑगस्ट रोजी आयुक्तालय, संभाजीनगर येथे उपोषण करण्यात येईल, असा इशाराही अर्जात देण्यात आला आहे.



# पाटोद्यात अनोखा वाढदिवस: वटवृक्षाचा वाढदिवस साजरा करताना जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे विद्यार्थी व शिक्षक

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा येथील केंद्रीय प्राथमिक जिल्हा परिषद शाळेने नुकताच एक अतिशय अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम राबवला. वाढदिवस नेहमी माणसांचा साजरा होतो, पण या शाळेच्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी चक्क एका वटवृक्षाचा वाढदिवस साजरा करून पर्यावरणाबद्दलची आपली बांधिलकी दाखवून दिली.

या अनोख्या वाढदिवस सोहळ्या निमित्त शाळेचे विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम, या वटवृक्षाची पूजा करून त्याला फुलांनी आणि माळांनी सजवण्यात आले.



विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधाण आले होते. त्यांनी मिळून वटवृक्षाभोवती 'हॅपी बर्थडे' गात टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला.यावेळी मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना झाडांचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले, झाडे आपल्याला ऑक्सिजन देतात, सावली देतात आणि पर्यावरणाचा समतोल राखतात. त्यामुळे झाडांची काळजी घेणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.या वाढदिवसाच्या निमित्ताने शाळेच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावली आणि त्यांच्या संगोपनाची शपथ घेतली.

हा उपक्रम केवळ एका झाडाचा वाढदिवस साजरा करण्यापुरता मर्यादित नव्हता, तर तो पर्यावरणाचे महत्त्व आणि प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये निसर्गाप्रती आदर निर्माण करण्याचा एक प्रयत्न होता. पाटोद्यात केंद्रीय प्राथमिक जिल्हा परिषद शाळेच्या या उपक्रमाने समाजा समोर एक आदर्श ठेवला असून, इतर शाळांसाठीही तो प्रेरणादायी ठरू शकतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन

# कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राकडून जागतिक युवा कौशल्य दिन साजरा

बीड ।प्रतिनिधी

जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, रोजगार मेळावे, इ. योजनांविषयी माहिती देत जागतिक युवा कौशल्य दिन आज (ता.१५) उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि जन शिक्षण संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुशिल उचले, कौशल्य विकास अधिकारी समाधान किरवले, जन शिक्षण संस्थानचे अध्यक्ष उपेंद्र कुलकर्णी, उपाध्यक्ष श्रीमती. डॉ. चोले, संचालक गंगाधर देशमुख, श्रीमती



बागलाने, अमोल मुळे, नितीन क्षीरसागर आदी उपस्थित होते.

पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा अंतर्गत सहभागी होणाऱ्या टाटाएआयजी, समर्थ नर्सिंग कॉलेज, गुरुकुल इंग्लिश स्कुल, एलआयसी, बीड आणि एस.जी.सोलुशन्स या आस्थापनांचा, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ अंतर्गत वैयक्तिक व्याज परतावा योजनेंतर्गत लाभ घेऊन उद्योजक झालेल्या लाभार्थ्यांचा, कौशल्य विकास योजनेंतर्गत उत्कृष्ट प्रशिक्षण दिल्याबद्दल प्रशिक्षण संस्थांचा सन्मान करण्यात आला. जन शिक्षण संस्थान, बीड या संस्थेमार्फत प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थीसाठी आयोजीत कौशल्य विकास काळाची गरज या विषयावरील निबंध स्पर्धा आणि ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थीसाठी आयोजित सौंदर्य व वेशभूषा स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. जन शिक्षण संस्थान, बीड या संस्थेमार्फत प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतून कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीना मान्यवरांच्या हस्ते टुलकिटचे वाटप करण्यात आले. अध्यक्षीय समारोप श्री. कुलकर्णी यांना केला. सूत्रसंचालन श्रीमती मानुरकर यांनी केले. श्री. देशमुख यांनी आभार मानले.

# देगलूर तालुक्यात जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना जाहीर

देगलूर : येत्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ पार्श्वभूमीवर देगलूर तालुक्यातील प्रभाग रचनेचे प्रारूप नुकतेच जाहीर करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या १४ जुलै रोजीच्या पत्राद्वारे ही अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली.या प्रारूप रचनेनुसार जिल्हा परिषद निवडणुकीसाठी देगलूर तालुक्यातील खानापूर, शहापूर, करडखेड, मरखेल व हाणेगाव हे विभाग निश्चित करण्यात आले आहेत.

तर पंचायत समिती देगलूरसाठी एकूण १० प्रभाग जाहीर करण्यात आले असून त्यामध्ये खानापूर, शहापूर, वळग, मरखेल, हाणेगाव, वन्नाळी, तमलूर, करडखेड, बेंबरा आणि वझर या गावांचा समावेश आहे.या प्रारूप प्रभाग रचनेबाबत नागरिकांनी हरकत, सूचना किंवा आक्षेप असल्यास ३१ जुलै २०२५ पर्यंत सकारण लेखी निवेदने तहसीलदार (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड अथवा तहसीलदार देगलूर यांच्याकडे सादर करावीत, असे आवाहन तहसीलदार भरत सूर्यवंशी यांनी केले आहे.



जरांगे पाटील याचे स्वागत करताना पाचेगाव चे गावकरी बादलशहा शेख गणेश ढेरे व मित्रमंडळ पाचेगाव ता.पाटोदा जिल्हा बीड

# केज तालुक्यात ११४ ग्रामपंचायतीचे सरपंच पदासाठी २०२५-२०३० आरक्षण जाहीर

## महिलांना व सर्व घटकांना न्याय देणारी आरक्षण सोडत घोषित

केज /प्रतिनिधी

ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी सन २०२५ - २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी आरक्षणाची सोडत दिनांक १५ जुलै २०२५ रोजी केज तहसील कार्यालयात जाहीर करण्यात आली.या आरक्षण सोडतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांना विशेष संधी देण्यात आली आहे.

या आरक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून एकूण ग्रामपंचायतींपैकी प्रत्येक प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणाचे गावनिहाय वितरण पुढीलप्रमाणे आहे.

अनुसूचित जाती (एस. सी)महिलांसाठी आरक्षित ग्रामपंचायती मांगवडगाव,इस्थळ, मोटेगाव,साळेगाव, हनुमंत पिंप्री, मस्साजोग,लाखा, बोरीसावरगाव,सादोळासर्वसाधारण (एस. सी.खुला) प्रवर्गासाठी:सारुळ, कोल्हेवाडी,धनेगाव, सौंदना,उंदरी, वरपगाव/कापरेवाडी, जवळबन,सोनिजवळा, लव्हूरी अनुसूचित जमाती (एस. टी)महिलांसाठी आरक्षित:ढाकेफळ सर्वसाधारण प्रवर्गासाठी: धोतरा

नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओ.बी.सी) महिलांसाठी आरक्षित ग्रामपंचायती :जोला, मुलेगाव,पिसेगाव, पिटीघाट,शेलगाव गांजी,सातेफळ, लिंबाचीवाडी,केकान वाडी,सोनेसांगवी, येवता,रामेश्वरवाडी/ ढाकनवाडी,कौडगाव, पाथरा,सावळेश्वर, बोबडेवाडी,नांदुरघाट नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण प्रवर्गासाठी(ओ.बी.सी) :आरणगाव,भाटुंबा, भोपला,दरडवाडी, डोका,काशीदवाडी, शिंदी,चिंचोलीमाळी, नाव्होली,लाडेवडगाव, पैठण,दहिफळ (वड), माळेगाव,बावची

सर्वसाधारण प्रवर्ग (ओपन)महिलांसाठी आरक्षित ग्रामपंचायती :लाडेगाव, कानडी माळी,कोठी, बोरगाव बुद्रुक,तरनळी, काळेगाव घाट, बनसारोळा,भालगाव, विडा/गौरवाडी,कासारी, आवसगाव/ वाकडी, पिंपळगव्हाण,हदगाव, माळेवाडी,दिपेवडगाव, कानडीबदन,कुंभेफळ, सुकळी,वाघेबाभळगाव,बानेगाव,नागझरी, सासुरा,डोनगाव, मुंडेवाडी,पिराचीवाडी, दैठणा,केकत सारणी, कोरेगाव,पळसखेडा, शिरपुरा,उमरी

खुल्या ( ओपन) प्रवर्गासाठी:गोटेगाव, जाधव जवळा,साबला, युसुफ वडगाव,होळ, बनकरंजा,एकुरका, तांबवा,आनंदगाव, केवड,सारणी आनंदगाव,सूर्डी,शिरूर घाट/गदळेवाडी, औरंगपूर,चंदन सावरगाव,केळगाव/ बेलगाव,जानेगाव, धर्माळा,देवगाव, कोरडेवाडी,आनेगाव, राजेगाव,टाकळी, सांगवी (आ), आंधळेवाडी,जिवाची वाडी/तुकुचीवाडी, घाटेवाडी,नारेवाडी, आडस,सारणी (आ), नायगाव इत्यादी ग्रामपंचायती असून आरक्षणाची ही प्रक्रिया शासनाच्या निर्देशानुसार पारदर्शक आणि संगणकीय प्रणालीद्वारे सोडतीच्या माध्यमातून पार पडली.ग्रामीण भागातील महिलांना नेतृत्व संधी देणारे हे आरक्षण भविष्यातील ग्रामविकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

# आरोग्य योजनेच्या अंतर्गत गोरगरीबांना सेवा देणारे लक्ष्मण कोरडे सत्कारित

बीड ।प्रतिनिधी

एकत्रित आयुष्मान भारत योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंतर्गत लक्ष्मण रोकडे यांनी गोर-गरीब लोकांना आरोग्य योजनांचा लाभ देत आहेत यामुळे त्यांचा सत्कार भाजपाचे गट कार्यकर्ता शेख मोहम्मद सलीम यांनी केला. यावेळी सोबत तेजस घोडके आदींनी सत्कार केला.

यावेळी सत्कारास प्रत्युत्तर देतांना लक्ष्मण कोरडे म्हणाले की, कोणताही रुग्ण उपचाराअभावी वंचित राहू नये यासाठी शासनाकडून आयुष्मान भारत योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य सारख्या महत्वपुर्ण योजना राबविल्या जात आहेत. या करिता कृष्णा हॉस्पीटल येथे येवून मला भेटावे अन्यथा ८९१९५७२६२३ या क्रमांकावर संपर्क साधावा आम्ही शासनस्तरावर पाठपुरावा करुन योग्य ती मदत करु असे आवाहन केले आहे.



# अखेर लोहा न.प.वर काँग्रेसचा मोर्चा धडकला ;न.प.प्रशासन हादरले

## घरकुलाचे बीले काढा शहरात स्वच्छता करा न.प.ला कायम ओएस द्या --एकनाथ मोरे

लोहा/प्रतिनिधी

अखेर दि१५.जुलै रोजी मंगळवारी लोहा नगर परिषद कार्यालयावर लोहा शहरातील नागरिकांच्या मुलभूत सोयी सुविधांच्या मागण्या प्रचंड घोषणाबाजी करीत मोठ्या संख्येने मोर्चा धडकला व त्यामुळे लोहा न.प. प्रशासन हादरले. गेल्या आठवड्यापासून बहुचर्चित काँग्रेस पक्षाचा मोर्चा लोहा न.प.वर लोहा शहरातील नागरिकांच्या मुलभूत सोयी सुविधांसाठी निघणार असल्याची लोहा शहरातील सामान्य जनता वाट पाहत होती व आज दि.१५ जुलै रोजी लोहा न.प.कार्यालयावर काँग्रेस पक्षाने लोहा न.प. वर प्रचंड धडक मोर्चा काढला. सदरील मोर्चा जुना लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करुन मुख्य रस्त्याने लोहा न.प.वर धडकला यावेळी सदरील मोर्चाचे नेतृत्व काँग्रेसचे लोहा -कंधार तालुका प्रभारी एकनाथ मोरे यांनी केले.

यावेळी काँग्रेसचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य श्रीनिवास मोरे, काँग्रेस कंधार तालुकाध्यक्ष संजय भोसीकर, काँग्रेसचे लोहा तालुकाध्यक्ष मधुकर पाटील दिघे, काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष रंगनाथ भुजबळ, काँग्रेसचे लोहा शहराध्यक्ष व्यंकटेश उर्फ सोनू संगेवार, माजी नगरसेवक वसंत (बापू) पवार, काँग्रेसचे



तालुका कोषाध्यक्ष शिवाजी आंबेकर, माजी पं.स. सदस्य डॉ.दता गवळी,युवक काँग्रेसचे बाबासाहेब बाबर, काँग्रेसचे सोनखेड सर्कल अध्यक्ष प्रकाश मोरे, कैलास मोरे,दिगांबर मेकाले, यांच्यासह लोहा शहरातील अनेक नागरिक, महिला भगिनींनी उपस्थित होत्या.

यावेळी काँग्रेस पक्षाच्या वतीने लोहा न.प.चे मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांना निवेदन देण्यात आले व सदरील निवेदन हे काँग्रेसचे लोहा -कंधार तालुका प्रभारी एकनाथ मोरे यांनी जनतेसमोर वाचुन दाखविले निवेदनात प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे करण्यात आल्या त्या पुढीलप्रमाणे लोहा शहरातील घरकुल लाभार्थ्यांचे थकीत हप्ते लष्करात लवकर देण्यात यावे ज्यांचे जियो टॅग केले नाहीत त्यांचे तात्काळ करण्यात यावे, जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी करुन लोहा न.प.ला कायम ओएस (कार्यालयीन अधीक्षक) द्यावा,दिव्यांग लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान तात्काळ देण्यात यावे,लोहा शहरातील दिवाबत्ती सुरळीत करण्यात यावी, लोहा शहरात सुरळीत व शुध्द पाणी पुरवठा करा, लोहा शहरातील अस्वच्छतेमुळे जनतेमध्ये पसरणाऱ्या रोगराईस आळा घालावा शहरातील तुंबन भरलेल्या नाल्या सफाई,कचऱ्याची साफसफाई करावी, लोहा शहरातील खड्ड्याची तात्काळ दुरुस्ती करून लोहा शहर खड्डेमुक्त करण्यात यावे, गुंठेवारी मध्ये होणाऱ्या भ्रष्टाचाराला आळा घालुन पारदर्शकता आणावी आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

मोर्चात महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग घरकुलाच्या अनुदानासाठी महिला झाल्या आक्रमक ,लोहा न.प.तील दलालराज बंद करण्याची केली मागणी तसेच यावेळी मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी मोर्चाचे निवेदन स्वीकारल्यानंतर जमलेल्या मोर्चातील महिला मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांच्याकडे शिवराळ भाषा करीत यांच्या दिशेने सरसावल्या त्यावेळी प्रसंगावधान राखून पोलिस निरीक्षक नागनाथ आयलाने व काँग्रेसचे लोहा शहराध्यक्ष व्यंकटेश उर्फ सोनू संगेवार यांनी महिलांची समजवूत काढीत महिलांना शांत केले त्यामुळे पुढील अनुचित प्रकार घडला नाही.सदरील मोर्चा लोकशाही मार्गाने शांततेच्या मार्गाने यशस्वी झाला व लोहा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आयलाने यांनी मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात केला होता.

# दिव्यांग, ज्येष्ठांना मोफत कृत्रिम साहित्य वाटपासाठी पूर्व तपासणी शिबिर

बीड ।प्रतिनिधी

खासदार बजरंग सोनवणे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यामध्ये दिव्यांग व्यक्ती व जेष्ठ नागरिकांना मोफत कृत्रिम साहित्य साधने वाटपाच्या अनुषंगाने पूर्व तपासणी शिबिर प्रत्येक तालुक्यातील पंचायत समितीत १८ ते ३० जुलै २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्धान १८ जुलै रोजी सकाळी १० वा. खासदार सोनवणे यांच्या हस्ते केज येथे होणार आहे. या शिबिराचा दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी एस. एन. मेश्राम व सर्व गटविकास अधिकारी यांनी केले आहे.

शिबिरात दिव्यांगांना जयपुरी फूट, कृत्रिम हात, कॅलीपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, वॉकिंग स्टीक, ब्रेल किट, स्मार्ट फोन, श्रवणयंत्र यांसह जेष्ठ नागरिकांना बेल्ट, वॉकर, काठ्या, चष्मे, कृत्रीम दात, खुबड, कृत्रीम अवयव, श्रवणयंत्र, व्हिलचेअर कमोडसहीत, सिलीकॉन खोम तकीया, नीब्रेस, स्पायनल सपोर्ट, सरवायकल कॉलर यासह इतर साधने उपलब्ध करून देण्यात येणार आहे.यासाठी दिव्यांगांनी दिव्यांग प्रमाणपत्र आणि णऊखऊ कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, वार्षिक उत्पन्नाचा दाखला उत्पन्न (मासिक २२ हजार ५०० रु. किंवा वार्षिक २ लक्ष ७० हजार रूपयांच्या आत असावे.) सोबत आणावीत. जेष्ठ नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, वर्षिक उत्पन्नाचा दाखला उत्पन्न (मासिक १५ हजार रु. किंवा वर्षिक एक लक्ष ८० हजार रूपयांच्या आत असावे) सोबत कागदपत्रे आणावयाची आहेत.केज येथे १८, अंबेजोगाई १९, बीड २१, माजलगाव २२, पाटोदा २३, वडवणी २४, आष्टी २५, धारूर २६, परळी वै.२८, शिरूर २९ आणि गेवराई येथे ३० तारखेला संबंधित पंचायत समिती कार्यालयात सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत शिबिरांचे आयोजन करण्यात आले असल्याचेही श्री. मेश्राम यांनी कळवले आहे.



# प्रयागबाई विष्णुपंत कुंडलकर यांचे वृद्धापकाळाने निधन

बीड :येथील पूर्णवादी परिवारातील ज्येष्ठ उपासक आदर्श पूर्णवादी शिक्षक अरूण कुंडलकर यांच्या मातोश्री श्रीमती प्रयागबाई विष्णुपंत कुंडलकर यांचे वयाच्या नव्वदाव्या वर्षी मंगळवारी खोकरमोह या राहत्या गावी निधन झाले.

त्यांच्या पश्चात अरूण आणि दिगंबर ही दोन मुले आणि नातवंडे पतवंडे असा मोठा परिवार आहे.